१८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
वा. नं. ३३३५
१२०

नं १८४ १२० रुप १९४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
नांव - श्रीमंत थोरले माधवराव पेशवे
ले - - -
विषय - नाटक
१८४

सं.क्र.

# श्रीमंत थोरले माधव

# पेशवे.

## नाटक

ना ८५

अनु-१८४

मार्तंड नारायण दवणे

सन १८९

ना
२१
०।। ३-२०
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० ८
ठाणें सन १८०

श्री शंकर प्रसन्न.

संगीत

# श्रीमंत थोरले माधवराव पेशवे

यांचें नाटक.

## अंक १ ला.

स्थळ सातारा.

नान्दी ( नमुनी ईश चरणा ) या चा०

त्रिपुर सुंदरीला । नमन हें असो शिवेच्या शुभचरणांला ॥
स्मरुनि शिवसुताला । गजाननाला नष्ट करी जो विघ्नांला ॥
तुझ्या कृपें झडकरी तडीस जावो अल्पकाव्य हें रचावया,
बुद्धि दे दयाळा ॥ त्रिपुर० ॥

( अष्ट मूर्ति परमेश सदाशिव. )

॥ मम कुल दैवत श्री मह्लारी मृत्युंजय स्मरला ॥
॥ मर्दन करुनी मणिमह्लाचें मोक्षतया दिधला ॥ ध्रु० ॥
॥ भक्त–काम– कल्पद्रुम भक्तां साठीं अवतरला ॥
॥ पुरवुनि त्यांचें कोड मनांतिल जेजुरींत वसला ॥
॥ येळकोट ह्मणतानां जाती दुरितें विलयाला ॥
॥ असा ह्माळसा पते, निरंतर रक्षीं मैराळा ॥ मम० ॥

( सूत्रधार प्रवेश करतो. )

साकी.

पांडुरंग सुत कविवर मम गुरू चिंतुनि बलवंताला ॥ यथा
मतीनें रचितों बुध हो या मी नव कवनाला ॥
दोषां टाकोनी ॥ सेवा गुण ते आदरुनी ॥
( इकडे तिकडे पाहून आपल्याशीं ) वः प्रियाही कशी सांगित-

त्याप्रमाणें वेळेवरच आली; पण पहा, ती कांहीं आपल्याशीं पुट पुटतच इकडे येत आहे. असो, तेव्हां ती काय ह्मणते तें ऐकून नंतर आपला उद्देश तिला कळवूं.

नटी—

( झाली ज्याची उपरर. )

चंडरश्मिचा अस्त जहाला ॥ मेघांनीं नभ भाग व्यापिला ॥
॥ ध्रु० ॥ नील वर्ण हे होउनि फिरती मधुन मधुन ती चमके
चपला ॥ १ ॥ धारा जर्जर अवनी झाली त्राता तिजला
कोणीं नुरला ॥ २ ॥ धडड धडड घन शब्दें गर्जती, वाटे रिपु
चा घाला आला ॥ ३ ॥ दीन नृपतिला जिंकुनि समरीं हरण करिति
कीं त्या खंडाला ॥ ४ ॥

सूत्रधार—वः शाबास प्रिये शाबास ! अगदीं समयास उचित असेंच ह्मणालीस. आपल्या साताऱ्यांत हल्लीं तीच स्थिती आहे. तुला ठाऊक असेलच.

साकी.

प्रथम पेशवा विश्वनाथ सुत बाळाजी, सुत त्याचा ॥
गाजे बाजी भारत वर्षीं, काळ खरा यवनाचा ॥
कीर्ति गाजवुनी ॥ गेला हळ हळ लावोनी ॥ १ ॥
नृप शाहूनें वस्त्रा भरणें देउनि बाळाजीस ॥
करुनि पेशवा शिक्का मोर्तब दिधलें अधिकारास ॥
बापासम गाजी ॥ प्रजाजन असती त्या राजी ॥ २ ॥

नटी—बरं मग प्राणनाथ ?

सू०—मग काय ? आधीं बाळाजी विश्वनाथानें शिद्दी, मोंगल बरेच जेरीस आणून दिल्ली पर्यंत स्वाऱ्या करून चौथाई व सरदेशमुखी वगैरे हक्क मिळविले होते; परंतु दुर्दैवानें शत्रूंस केवळ काळच असा पेशवा मृत्यू मुखीं पडला, यामुळें राष्ट्ररूपी इमारतीस मोठाच धक्का बसला; पुढें दैव बलवत्तर ह्मणून श्रीमंत बाजीराव बल्लाळ हाच

प्रजा कल्याणेच्छु व शत्रूंस केवळ महाकाळच असा पेशवा झाला. त्यानें तिळमात्रहि यवनांची डाळ न शिजूं देतां त्यास लाळ घोंटा-यासच लाविलें. निजामउलमुल्क व बाजीराव ह्मणजे समरांगणीं केवळ भीष्मार्जुनच भासत असत. परंतु त्या अविंधाला सुद्धां राव बाजीनें जर्जर केलें. कोंकण प्रांतीं पेशव्याचा धाकटा भाऊ चिमणाजी हाही सिंहाप्रमाणें गर्जत होता. त्यानें फिरंगी लोकांस दे माय धरणी ठाय करावयास लावून त्यांचा प्रसिद्ध वसईचा किल्ला घेतला. परंतु हीहि राम लक्ष्मणाची जोडी त्या दुष्ट काळानें नाहींशी केली. पुढें बाळाजी बाजीराव पेशवा झाल्यावर त्याची तर खुपच वहावा झाली, ती ऐक.

( सावध व्हा काय तुह्मी. )

राघोबा भर भरते देश जिंकुनी ॥
चिमणाजी सुत भाऊ तोहि बहु गुणी ॥ ध्रु० ॥
मोंगल परि मत्त, वीर्य–रहित जाहले ॥
झेंडे ते अटके वरि बहु उभारिले ॥
गिलचे परि घात करायास सज्जले ॥
भाऊ विश्वासराव त्यानिं मारिले ॥
शत्रूंनीं देश कितिक फस्त जाळुनीं ॥ राघोबा ॥

( दुःखानें )

दिंडी.

श्रवण करुनींही दुःख मयी वार्ता ॥
दुष्ट यवनांचे प्राण सत्य हर्ता ॥
बसे धडकी छातींत पेशव्यांच्या ॥
मृत्यु गांठी मोहऱ्यास मराठ्यांच्या ॥

( पडद्यांत. )

" ऐका हो ऐका. श्रीमंत छत्रपती रामराज महाराज यांची अशी आज्ञा आहे कीं, कैलासवासी नाना साहेब पेशवे यांचे चिरंजीव रावसाहेब माधवराव यांस उदयीक पेशवाईची वस्त्रें देण्याचा समारंभ होणार

आहे, करितां सर्व नगरवासी जनांनीं त्या वेळीं दरबारांत हजर रहावें"

सू०—धन्यधन्य आमचे रावसाहेब! शतायुषी होऊन अनंतकाल पर्यंत आमच्यावर राज्य करोत. ( नटीस ) प्रिये, ऐकलेंसना, दीनांचा साहकारी परमेश्वर ह्मणूनच आपल्या महाराजांस रावसाहेबां सारखा पेशवा मिळाला. खरोखर फारच आनंदाची गोष्ट.

न०—त्या मेल्या यवनांचं नांव ऐकलं ह्मणजे माझ्या किनई उरा मध्यें धस्स होतं. आपली ती ठमाकाकू, तिचा बिचारीचा एकुलता एकच मुलगा हो; चांगल्या दोन चार लढाया मारलेला; पण या आतांच्या मोठ्या लढाईत तो कुठं गेला, कीं काय झालं बिचाऱ्याचं कांहीं कळत नाहीं. कोणाचे भाऊ, कोणाचे बाप, कोणाचे मुलगे, कोणा बिचाऱ्या बायकांचे नवरे, असे या लढाईत मरून किती अनर्थ झाले असतील त्याचा पत्ता नाहीं. तिची बिचारीची सून तर नवरा येत नाहीं असें ह्मणून मनांतल्या मनांत झुरून अन्न पाणी सुद्धां टाकून एक सारखी रडत आहे.

( तोफांची सरबत्ती होते. व पडद्यांत पुन्हां शब्द होतो. )

सू०—( आनंदानें )

साकी.

बघ इकडे हा अरुण सूचवी उदय चंड रश्मीचा ॥
ऐकें घन रव लक्ष्य देउनीं सखये तो हेरांचा ॥
जाऊं चल आतां ॥ झाली दूर सर्व चिंता ॥ १ ॥

( नटी सूत्रधार जातात. )

---

## प्रवेश १ ला.

( एक मराठा शिपाई लंगडत लंगडत प्रवेश करतो. )

( मोठ्या दुःखानें )

लावणी

ग्येलि ग्येलि मराठ शाई ॥ झाली जत तत मोंगलाई ॥ ग्येली० ॥

कुठ ग्यल बड सरदार ॥ झाल पार, केलं ते ठार ॥ नाहीं परत
आला कुणी ॥ ग्येला सोडुन, घराला पानी ॥ झाला संभूचा
अवतार ॥ केल मोंगल, सम्द थंड गार ॥ राव बाजी बामन्
गडी ॥ नोडग्यांची, मोडली खोडी ॥ रन कठीन पानपत ॥
घात होऊन, झाली नापत ॥ कोन होईल आमचा धनी ॥
राखि लाज, आई भवानी ॥ ७ ॥

जशी भरताराविन कामिना तशी आमची राव दशा. दोन पाराचे येळी पोटांत कावळ लागल वरडायला अन लढाईचा ऐन रंग न मंग काय? घे तरवार, मार कोणाच्या तरी ब्वाडक्यांत, अन् हो मोकळा. अस व्हतां व्हतां शिरमंत इश्वासराव सायबांस गोळी लागून ते धाडकन जमनीवर पडले. ( डोळ्यांस पाणी आणून ) त्या प्राण्यान हूं कीं चूं बगा केलं नाय. त्या यळेसच आमची फौज धूम पळत सुटली. भाऊसाब बी घोड्यावर बसून जे म्होर घुसल ते फिरून आमी पायल बी नाईत. मंग तर सम्दाच ख्वाटाळा झाला आमचा. त्या नोडग्यानीं तर धर मराठा, काप डवाचकं, अस करकरून येक मोठा डोंगर केला व्हता. नग र बाबा तो परसंग. ( दात ओंठ चावून ) आमच करम पडल वांकड नाहीं तर त्या मुंसंड्याना चरार् चरार् येकी खिणांत कापून टाकलं असतं. ( इतक्यांत दोघे तिघे भिक्षुक लगबगीनें प्रवेश करितात. )

**प० भि०**—अरे ए लेकीच्यानों, सहा वाजलेनां. नाहीं तर मग घ्या दक्षणा ( आंगठा दाखवितो. )

**दु० भि०**—अरे पण शौच्यविधी मुखमार्जन स्नान वगैरे उरकण्या पूर्वीच जातोस कायरे!

**ति० भि०**—अरे ए धोंडपट्टी नाहीं कां अऊक परती तूंस? नेसायला स्वच्छ धोतरें, अष्टगंध गंधाचा टिळा कीं झालें काम.

**मराठा**—( आपल्याशीं ) बामनांस सम्द दिस सारखच. न्हवरा

मरो का न्हवरी मरो, त्यांस काय. सोड पानी दे दुगानी. लग्नाच्या पोल्या बी खायाला तयार आन् सराद बी खायाला झोर. बरं, ह्यास नि इचाराव तर खर कुनिकड चालला मंगून. ( पुढें होऊन ) राम राम शास्तरी बोवा. आज लई धामधुमशी ?

**प० भि०**—( शिपायास पाहून घाबरून ) हवलदार आपले श्रीमंत नाना साहेब पेशवे यांचे मुलगे माधवराव यांस आज पेशवाईचीं वस्त्रें महाराजांकडून मिळावयाचीं आहेत ह्मणून आह्मी तिकडे जलदीनें जात आहों. तुह्मी नाहींनां येत !

**मराठा**—एनार मंजे हे काय इचारतां ? धाकट शिरमंत आमच धनी, मा बाप हायती; आन हामी त्यांचे चाकूर भाकर खाऊनशी त्यांची चाकरी करूं. कुठ हायती आमचे शिरमंत. ( कृतज्ञतेनें )

लावणी.

पुण्य परतापी शिरमंतानां कधीं मी पाहीन ॥ देवा ॥ कधीं० ॥
जाउनि त्याच्या चरनीं माझा माथा ठेवीन ॥
आई भवानी देई त्यांनां उदंड आवूख ॥
समद्या परजेला होईल देवा लई लई सूख ॥ १ ॥

सर्व जातात. ( प्रवेश प० समाप्त. )

( पडद्यांत. )

श्लोक.

पहिला—म्लेंच्छांतें वधण्या शुभंकर प्रभू झाला शिवाजी नृप ॥
कांपे थर्थर म्लेंच्छराज सकलां जो सिंहसा दिह्लिप ॥
स्वामीची बरवी कृपा ह्मणुनियां हें राज्य सर्वां—वर ॥
झेंडा हा फडको सुभव्य भगवा ह्या आर्यभूमीवर ॥ १ ॥

दुसरा—राखो स्वधर्म प्रतिपाळुनि गोद्विजांना ॥
लक्ष्मी वसो अचळ दुःख कधीं टिकेना ॥

लाभो गुणज्ञ मन निर्मळ तें कलत्र ॥
नांदो सुखें बहुत काळ सुपुत्र पौत्र ॥ २ ॥
( छत्रपति हिंदुपदं पादशाह रामराज्य महाराज. )

( पडदा उघडतो. )

( प्रतिनिधि वगैरे लवून खडी तालीम देतात; रघुनाथराव व माधवराव हे मुजरा करून बसतात. ) ( सर्व बसल्यानंतर. )

**रघुनाथराव**—( दुःखानें ) सरकार सर्व जाणतच आहेत. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. सरकारांनीं आजपर्यंत आमचा परामर्ष घेतला ह्मणुनच हे नानासाहेब यांचे चिरंजीव माधवराव सरकारच्या पायांवर घालण्याकरितां आणिले आहेत.

**रामराजे**—( आपल्याशीं ) आहाहा ! तोंडावरून एक तिळभरही कमजास्त फेर दिसत नाहीं, जणुं तीच मुर्ति. ( उघड ) आपलें नांव ?

**माधवराव**—मला माधव ह्मणतात.

**रामराजे**—( प्रतिनिधीस ) पाहिलीतनां किति लीनता ती ?

**रघु०**—हुशारीही तशीच आहे.

**राम०**—( खजीनदारास ) वस्त्रें आणा पाहूं ? ( वस्त्रें आणवून तीं घेऊन ) माधवराव, हीं घ्या पेशवाईचीं वस्त्रें; आज पासून तुह्मीं आमचे कारभारी झालांत. तुमचे वडील, आजे, पणजे, ज्या प्रमाणें आपली कीर्ति गाजवून या लोकीं त्यांनीं आपलें नांव अजरामर केलें त्या प्रमाणें तुह्मी आपली तरवार गाजवून, अविधांपासून आर्य जननीस व गोब्राह्मणांस रक्षावें. पानपतच्या लढाईंत आपली दशा तुह्मीं ऐकली असेलच; तरी त्याचें उसनें फेडून तुमच्या स्वर्गस्थ पितरांचें मन तृप्त करा. व तुमच्या पराक्रमानें त्यांचें आह्मांस विस्मरण पाडा, हें माझें तुह्मांस सांगणें आहे. झाल्या गोष्टी झाल्या त्याबद्दल खेद न करितां अधिक धैर्य धरून जेणें करून स्वदेशाचें कल्याण होईल अशी युक्ति योजा. केवळ ऐश आरामांत आपला काळ न दवडितां आपलें

कर्तव्य तें करण्यास तुह्मीं कधींही चुकणार नाहींत या बद्दल माझी पक्की खातरी आहे. जास्त कशास सांगितलें पाहिजे? तुह्मीं जाणतच आहां. स्वराज्याची पडतीकळा लक्ष्यांत आणा ह्मणजे तुह्मांला सर्व समजेल.

**पंत प्रधान**—सरकार, सिंहाच्या बच्याला गज गंडस्थळ विंदारण कसें करावें हें सांगणें नकोच! तें तो जन्मतांच शिकलेला असतो.

**राम०**—थोरल्या महाराजांच्या पुण्य प्रतापानें व श्री कुलस्वामीणी भवानीच्या कृपेनें तुह्मीं सर्व कामांत यश मिळवाल. यत्न करणें मात्र आपलें काम आहे. कां माधवराव?

**माध०**—( उभा राहून हात जोडून ) आज दरबार भरून योग्य मानानें मला पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं त्या बद्दल सरकारचे आह्मी ऋणीच आहोंत; आतां सरकारांनीं चार उपदेशपर शब्द बोलून या सेवकास आज्ञा केली तीही मला शिरसावंद्य आहे. वडिलांनीं ज्या प्रमाणें आपला देह या गादीच्या कल्याणार्थ झिजविला तदनुसार हा देहही झिजविण्याचा मी कृत संकल्पच केला आहे. यवनांचा आह्मां आर्यांवर झालेला जुलूम, गोब्राह्मणांचा छल, धर्माची अवहेलना, वगैरे गोष्टी लक्ष्यांत आणिल्या ह्मणजे धिःकार असो आह्मां आर्यवीरांना (!) कीं जिच्या पोटीं जन्म घेतला, जिनें आपणास लहानाचे मोठे केलें, तिला त्या दुष्ट अविंधांच्या सर्वस्वीं आपण कबज्यांत दिली आहे. असो, परमेश्वर आमचा सहाकारी आहे ह्मणून औरंगझेबाची पुंगी बंद करण्यास व हिंदुपद पादशाही स्थापन करण्यास शिवाजी महाराज अवतरले, त्यांचे जे हेतु ते अंशतः तरी माझ्या हातून तडीस गेले तरी मी आपल्यास धन्य मानीन. आर्यमाता व गोब्राह्मण यांचें पालन करीन. अविंधांचें निर्मूलन केल्या खेरीज विश्रांतीच घ्यावयाची नाहीं; फार काय सांगूं? प्राणांत झालेला पत्करेल परंतु हा माधवराव मोंगलांस कधींही हारला जाणार नाहीं. समस्त सरदार मानकरीहो! आणखी एक आपल्या सर्वांत मोठी उणीव कीं, आपसांतल्या फांटा-

फुटी; त्या जर बंद झाल्या तर गलीम ह्मणजे काय विशाद आहे ? अशा समयीं सर्वांनीं काया वाचा मनें करून, आपसांतला द्वैतभाव टाकून देऊन आपण सर्व ब्राह्मण, मराठे एक हिंदू आहोंत असें मानून नेकीनें शत्रूंवर तुटून पडलें पाहिजे. श्री भवानीच्या वरप्रसादें करून सर्व कांहीं निर्विघ्न तडीस जाईल. म्लेंच्छांचें निर्बीज करणें ह्मणजे क्षणार्धाचें काम असें समजावें. ह्या माझ्या ह्मणण्याचा सर्वांनीं विचार करावा अशी माझी हात जोडून विनंति आहे.

रामराजे—शाबास, माधवराव शाबास, तुझी राव, शत्रूंचा डावपेंच मनांत अक्षय बाळगून त्यांची हाव जागच्या जागीं जिरवून अखेरीस त्यांस कावकाव करावयास लावून गांवोगांव पळण्यास लावा. व श्री भवानीच्या कृपेनें विजयी होऊन हिंदूंचें रक्षण करून आपले राज्याचा भगवा झेंडा चिरकाल या भरत भूमीवर फडकून राहील असें करा. समस्त सरदार हो, या गोष्टीस तुमचें कसें काय अनुमोदन आहे!

मराठे सरदार--महाराज हें काय इचाराव ? मुसंड्यांच नांव ऐकून अक्षी भवानी कशी तय्यार आहे तेंच्या नरडीचा घोंट घेयाला! सरकार आज्ञा मातर होवी.

रामराजे--प्रतिनिधी, श्रम परिहारार्थ थोडेंसें गाणें बजावणें करवून मग दरबार बरखास्त करावा.

प्रतिनिधी--जी आज्ञा.

( गवई प्रवेश करितो. )

गवई---

( वैशाख मासि वासंतिक )

श्रीमंत रामराज छत्रपती शोभला ॥
स्वच्छ नभीं लोकमित्र जेविं उदेला ॥ धृ० ॥
ग्रहगण हे अष्ठ प्रधानादि शोभती ॥
सेनेश पंत-प्रतिनिधि ते सचिव दीसती ॥

समशेर खेंचुनी कितीक वीर बैसती ॥
भाग्यवान नच ऐसा आज मितीला ॥ श्री० ॥
खद्योत म्लेंच्छ लाजविती काय दिनकरा ॥
समरांत गांठुनी तयां गुलाम ते करा ॥
सरदार मानकरी तुह्मीं प्रीतिला वरा ॥
देउनि सन्मान भजा आर्य जननिला ॥ श्री० ॥
समरांत मरण क्षत्रियांस उचित तें असे ॥
जन्म मृत्यु पुनरपि त्यां पावणें नसे ॥
स्वर्गींही अनुपम सुख प्राप्त होतसे ॥
दुर्मिळ ही वेळ सत्य सत्य तुह्मांला ॥ श्री० ॥

( भालदार ११ चा अंमल झाला असें पुकारतो. पानसुपारी होऊन दरबार खलास होतो— )

पडदा पडतो.

---

## प्रवेश २ रा.

( पुनरपि तेच ब्राह्मण प्रवेश करितात. )

**पहिला**—वाः दरबार मोठा बाहरीचा झाला. खरं कीं नाहीं हो !

**दुसरा**—तें काय विचारतोस ! बाबा कसें तरी स्वराज्य आहे ना ? ह्मणून आज हे कोठें छत्रपती दृष्टिस पडले, नाहींतर या अल्ला भिस्मिल्ला असता ह्मणजे खाण्याला सुद्धां मिळायाची पंचाईत पडती.

**पहिला**—कांहो हेच कां ते रावसाहेब माधवराव ? अल्प वय आहे पण मूर्ति मोठी कडक आहे. काय त्यांचें तें त्या वेळचें मोठें अवसानाचें भाषण; सर्व दरबार कसा अगदीं चित्रासारखा तटस्थ त्यांच्या तोंडाकडे पाहात होता. यंवरे जवान मर्द ब्राह्मणभाई.

**दुसरा**—खाण तशी माती. बाप पाहिलासना कसा होता तो ? शत्रू पाहिला कीं धांवला वाघा सारखा. दाता ह्मटला ह्मणजे कर्णच. श्रा-

वणमार्गी अन्नाची खिचडी वांटीत असत व शिवाय दक्षिणा मिळे. एक साल तर द्रव्याची खिचडी वांटली. अशी पेशव्यांची तर अचाट संपत्ति. बाबा तूं काय पाहिलें आहेस.—**भोज्यं भोजन शक्तिश्च, रति शक्ति र्वरांगना ॥ विभवो दानशक्तिश्च नाल्पस्य तपसः फलं ॥ १ ॥**

**पहिला**—उदयीक ब्राह्मण भोजनाचा एक वडा समारंभ उरकून, नंतर ह्मणतात पेशवे पुण्यास जाणार आहेत खरं काय हो ?

**दुसरा**—मग तर मोठीच मौज. शक्कर भात झोडून ( बोटावर बोट घांसून ) अर्धा रुपया दक्षिणा घेऊन खमंग ढेकरा देत बसूं.

**पहिला**—बरं आज आह्मीं जातों आमच्या यजमानांकडे ब्राह्मण भोजन आहे तेथें.

**दुसरा**—मग काय आज दक्षिणेचा लाटच लाट.

**पहिला**—छे हो ( तोंड वांईट करून ) जेवायाला, आणिं एक पैसा दक्षिणा दुसरं काय ?

( दोघे निराळ्या मार्गानें जातात. )

पडदा पडतो.

**पहिला अंक समाप्त.**

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**( रघुनाथराव व सखारामपंत बसले आहेत. )**

र०—बापू ऐकलात नां चमत्कार ! दोन दिवस झाले नाहींत तोंच लागला हा कालचा पोर मला नांवें ठेवायाला; नागवा उघडा याला आह्मी कडेवर घेतलेला, तो ह्मणतो दादांचें बोलणें ह्मणजे अविचाराचें; ते घोरराव दक्षिणेंतून आपली अक्कल उघळून आले ते ह्मणे शहाणे— त्र्यंबकराव मामा, आणि जिवाचे ताईत शास्त्रीबोवा. शत्रू आंगाशीं भि-

डल्यावर मग ह्मणे सैन्याचा गौण पक्ष आहे, तें थकलें आहे, सल्ला करावा, घेतलेले मुलुख परत द्यावे, वार्षिक खंडणीचा हक्क बुडवावा, असा हा भागूबाईपणा काय कामाचा ? निजामअल्ली ह्मणजे काय पदार्थ आहे ! जों पर्यंत हा पंचानन पाहिला नाहीं तों पर्यंत तो लांडा कोल्हा पाहिजे तितकी कां गडबड करीना ! त्याला काय घाबरावयाचें ? आह्मी तर एकदम आपला सल्ला दिला, परंतु यांच्या नेभळेपणामुळें जर कां त्या मुसंड्यानें एकदां चाल केली तर, यांचे हाल कुत्रा खाणार नाहीं. तो बिचारा गंगोबातात्या आज याच्या वडलां सारखा आणि भर दरबारांत त्याच्या तोंडांत मारावी हें याच्या अकलेस शोभलें काय ? हा आह्मांसही एखादे दिवशीं असाच मारील. बिचारा एवढेंच बोलला कीं, काय सर्व दरबार ह्मणजे पोरखेळ चालला आहे ? असा राग काय कामाचा ? **अति राग आणि भीक माग.** शास्त्रीबोवा दुटप्पी बोलतो परंतु सर्वांस तो जाडा स्पष्टवक्ता वाटतो. आतांच्या काळचीं हीं फाजील पोरें, यानां तारतम्य-भाव बिलकूल नाहीं. बापाच्यामागें काय दिग्वीजय लावतात कोण जाणे. इतके दिवस या राघोबास हूं कीं चूं बोलण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. तो हा माधवराव लागला एकेक अभिप्राय आमचे विरुद्ध ठोकून देण्याला. बाप नव्हता असा बेअकली आणि त्याच्याच शब्दाला गुंतून मी आपली अमर्यादा व कुत्रेतोंड करून घेतों आहें. नाहीं पेक्षां मी खुशाल हरी हरी ह्मणत कोठें तरी बसलों असतों.

**सखाराम०**—एवढ्यांतच हरि हरि कां ह्मणतां ? पोरवंडा झाला ह्मणून काय झालें. आपण अर्ध्या राज्याचे धनी आहांत धनी ! यानां असें वाचरून काय होत आहे. मला वाटतें खुशाल अर्धा हिस्सा घेऊन विभक्त व्हावें त्या सारखी मजा नाहीं.

र०—बापू, तें सारं खरं पण आजच असें करून कसें चालणार ? चार लोक माझ्याच तोंडावर छीः थुः करतील आणि ह्मणतील कीं

वडील ते कशाला पाहिजेत ! माधवराव तें पोर त्याला कान धरून पाहिजे तसा वांकवावा. आणि तो ऐकण्यासारखा मनुष्य आहे. जग हें त्रिविध आहे, ह्या हातावरची पोळी त्या हातावर; खरोखर मराठ्यांनीं तरवार गाजवून जीं ठाणीं व जी खंडणी मिळविली तिचा असा दुरुपयोग करणें व आपला नामर्दपणा त्या शिखानष्ठास दाखविणें ह्मणजे भागूबाईचें काम आहे; इतकेंच नव्हे तर आजपर्यंत मराठ्यांच्या गाजलेल्या कीर्तीस काळिमा लागला असें ह्मणणेंही भाग आहे.

स०—दादासाहेब, आपण पाहिजे तसें केलेंत व आपल्यास कितीही संताप करून घेतलात तरी हें गाडें बेताल झालेलें ताळ्यावर येणें कठीण आहे. आपण कां काळजी करितां ! खुशाल अर्धा हिस्सा घेऊन व्हा बाजूला. एक घाव दोन तुकडे केल्याविना शेवट नाहीं. असे तंटे व आपसांतल्या चुरशी पासून व पुढें होणाऱ्या घोंटाळ्या पासून आतांच अलग व्हावें यांतच आपली इष्ट कार्यसिद्धी आहे. मी आपल्यास सुचवावें असें नाहीं.

र०—बरं तर मग तुमच्या सुचने प्रमाणेंच उदयीक दरबारांत जावयाचें नाहीं असा माझा कृत संकल्पच; परंतु मी घरीं बसल्यावर तुह्मीही कामाचा राजीनामा द्यावा; आपल्या कटांतील सर्वत्र मंडळीसही अशीच ताकीद द्यावी कीं जेणें करून माधवरावाच्या राज्याचा घोंटाळा होऊन तो आपल्या पायां पडतच येईल, तरी आपण आपला निश्चय किमपीहि बदलावयाचा नाहीं समजलांतनां बापू !

स०—मी आपल्या बाहेर एक तिळभर सुध्धां नाहीं. फार काय सांगू, जिवांत जीव आहे तों पर्यंत हा देह आपल्या सेवेसीं अर्पण केला आहे, आपल्या मनांत तिळमात्र सुद्धां संषय येऊं नये.

र०—झालंतर मग उद्यां असं करावयाचें हो ! सर्वांस कडक ताकिद द्या बरें; जा तुह्मी आतां उद्यांची योग्य तजवीज करा.

( दोघे जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

दिवाणखाना.

( आनंदीबाई येते. )

**आनंदी**—( रागानें ) गजे, अग ए गजेटले, अग फुटले कां कान साफ ?

**चाकर**—जी बाईसाहेब, जी हुकूम.

**आ०**—निघ मेल्या. तूंरे का बायकोचा भावोजी; लुवरा मेला—बायको गेली हात धरून आणि हा आला जी बाईसाहेब जी बाई-साहेब करीत.

( गजाऊ येते. )

( दूर उभी राहून ) ( चाकर तिला पुढें लोटतो व आपण पसार होतो)

**आनंदी**—डोळे फुटले काग ! हा केर कोण काढील तुझा बाप कां धगड ! अद्याप बिछाने घातले नाहींत, स्वारी येण्याची वेळ तुला माहीत नाहीं वाटतं ! निलाजरे, गेली होतीस कुठं :

**गजाऊ**—बाईसाब आपून मघांच बेगी बेगी धाकल्या बाईसाबांकडे जायाला सांगितलं झणून तकड गेलु. तकडचा थाट काय !

मध्येंच.

**आ०**—( हंसून ) बरं गजे, मग तिकडचा समाचार कसा काय सांग पाहूं.

**गजी**—तकडचा थाट काय ईचारायची सोय नाय. समदच नव. झाल नवा, बाईसाब नवी, झाराज नव, डागिन नव, कापड नव, अन कायन् कायच. ( आनंदीबाई दीर्घ श्वास सोडते. ) ( एकीकडे आप-ल्याशीं ) मीबी थोडासा किसरी भात आन चार बुंदीच लाडू खाल्ल. धाकल्या बाईसाब समद्यांशीं गोड लय गोड, न्हाही तर यो दीवा.

**आ०**—( आपल्याशीं ) आग लागो तिच्या वैभवाला ( गजेस ) आणखी काय !

गजी०—बाईसाब, पन आपल्या वानीं गम्मत आनीं वैभव कुनाच हाये.

आ०—तसेंच होवो आणि तुझ्या तोंडांत साखर पडो.

( रघुनाथराव येतात. )

रघुनाथराव—( गजाऊस ) गजाऊ, तुझ्या बाईसाहेब काय करीत आहेत ?

गजाऊ—महाराज, आपलीच वाट पात्यात. ( आनंदीबाई उभी राहते. ) ( रघुनाथराव बसतात. )

र०—या अशा बसा. ( बसते, ) ( गजाऊ जाते, ) ( आपल्याशीं ) अरे हा रघुनाथराव ह्मणजे कसल्या योग्यतेचा मनुष्य, आणि आज मितीस त्याची अशी दशा असावीना ! काळ फिरला यांत कांहीं संषय नाहीं. असो ये बी दीन जाएंगे. ( श्वास सोडतो. )

आ०—कां ! आज अगदीं उदास असावयाचें ! नेहमींचा चेहरा ह्मणजे जसा सिंहासारखा उग्र, कोण बाई पाहील त्या तोंडाकडे (!) पण आतांशीं किं नाहीं, त्याजवर टवटवी अशी तिळभर सुद्धां नाहीं. काय बाई असेल हें !

र०—अग काय सांगू ! तो कारटा कालचा पण त्याला स्वर्ग दोन बोटें उरला आहे. कारभार ह्मणे तुह्मी चांगला करीत नाहीं. तुमचें बोलणें अविचाराचें; तो माम्या नीं तो शास्त्री काय ते जीवकीं प्राण आणि ते करतील तें प्रमाण. कानामागून येऊन तिखट झाला पहा कसा तो. उद्यां तर दरबारांत पाय ठेवावयाचा नाहीं असा मी संकल्प केला आहे. मींचसा काय, बापू वगैरे आपल्या तर्फेची सर्व मंडळी सुद्धां उद्यां आपआपल्या कामाचा राजीनामा देणार, मग पहातों कसा कारभार चालवितो तो. एका घटकेंत याची थोबडी बंद करून त्यास पायां पडण्यास न लावीन तर नांवाचा रघुनाथरावच नव्हे; समजलीस !!

आ०—हें सारं मला पूर्वींच कळलं होतं. त्याचं सगळं मूळ ती रमाच होय. दिसायला भाबडी, पण पोटांत सगळी घाण भरली आहे.

कलहकृत्या, नवरा मेशपात्र्या, बाईलबुद्ध्या, बायको सांगते तसा मेला नंदी बैला सारखा मान हालवतो. इकडची चाहडी तिकडे, तिकडची इकडे करून आवदसा लावालावी करिते. तो मेला मामा कुठे भीक मागावयास गेला होता तो आल्याबरोबर त्या बयाच्या महालांत पहिल्यानें गेला. तेव्हांच त्याचे कांहींतरी कान मंत्र झाले असतील:—आपण कशाला जावें. आपल्याला बसल्या जागीं बातम्या आयत्या मिळतात. त्या ऐकून तिनेंच माधवाचे कान लागेल तसे फुंकले असतील. मग काय भुताच्या हातीं कोलतं.

र०—बरोबर, तूं ह्मणतेस तेंच खरें. तिला वाटत असेल आह्मीं बाईसाहेब, आमचे भ्रतार पेशवे सरकार, तेव्हां आह्मीं जें करूं ती पूर्व दिशा; पण अद्याप इंगा कुठे फिरला आहे ? उद्यांच कारभार कसा चालतो तो पहातों. मग पहा—तोच कसा रडत येऊन दादा आतां या आणि आपला कारभार पहा असें ह्मणेल ! !

आ०—एवढी भानगड तरी कशास व्हावी. आपला अर्ध्या राज्याचा हिसा कां नाहीं घेणं होत ?

र०—अग हें पहा. ही त्याचीच प्रस्तावना आहे, त्यानें पाहिजे तें केलें तरी आपलें एक उत्तर, मी येत नाहीं असें; ह्मणजे आपोआपच व्यवस्था लागेल.

आ०—बरं तर मग, आतां ठरलें तें ठरलेंच हो. नाहीं तर उद्यां कोणी भुरळ घालील.

र०—अग काय विशाद, उद्यां तुला अर्ध्या राज्याची स्वामिणी बनविलीच असें समज. चला रात्र फार झाली आतां, निजावयास जाऊं.

पडदा पडतो.

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

( माधवरावाचा ऐनेमहाल. )

( रघुनाथराव प्रवेश करितात. ) ( पहारेकऱ्यांस. )

कोण आहेरे पाहाऱ्यावर? सरकार स्वारी उठली नाहीं वाटतं?

**पहारेकरी**-जी सरकार, सरकार स्वारी उठल्या ती, जाउनशीं वर्दी लावतों. ( तसें करतो )

**पहारेकरी**- ( पुढें होऊन ) धाकल सरकार आपल्यासनी बोलावल्यात; ह्या रस्त्यानं चलावं सरकार.

( माधवराव पलंगावर बसले आहेत असा पडदा उघडतो. )

**माधवराव**- ( आपल्याशीं ) निजामअल्लीच्या प्रकरणापासून स्वारीचा राग आमच्यावर फारच झाला आहे, त्यांत चार दिशांची चार मंडळी पडली चमत्कारीक. त्यांनीं कान भरून कांहीं तरी घोंटाळा केला असेल; बाकी एरव्हीं दादासाहेब ह्मणजे भोळा शंकराचा अवतार; परंतु त्या आनंदीकाकूला हात जोडावे; चार दिशेची चांडाळ मडळी पत्करेल. पण त्या काकूचा संबंध नको. ती काय कुलंगडीं उपस्थित करील नी काय ह्याचा भरंवसा नाहीं. स्त्रिया ह्मणजे पूर्वापार दुष्ट, घातकी, मायावी, साहसी ठरलेल्या आहेत; परंतु त्या सर्व दुर्गुणाची खाणच आमची काकू ह्मटली तरी चालेल. आह्मांस हें वैभव दैवयोगें मिळालें तें तिच्यानें एक पळभर सुद्धां पाहवत नसेल. ती दररोज कांहीं नां कांहीं तरी कारण घेऊन आह्मां उभयतांस लाखोली मोजीत असेल. आज दादासाहेब अवर्णनीय शूर, राघोबा भरारी या नांवानें सर्वत्र नावाजलेले, अटकेवर मराठ्यांचा झेंडा लावलेले; परंतु या स्त्रयेच्या प्रेमपाशांत बद्ध झाले आहेत. ( दीर्घ धारा सोडून ) " बुद्धिःकर्मानुसारिणी " हें का त्यांना कळत नसेल परंतु इलाज नाहीं. हे पहा क्रुद्ध मुद्रेनें ते इकडेसच येत आहेत.

( रघुनाथराव येतात. )

माधव०—( उठून दादासाहेबांच्या पायांवर डोकें ठेऊन ) दादा, या बसा.

दादा—( क्रुद्ध मुद्रेनें ) आज पासून आमच्या कामाचा आह्मीं हा राजीनामा दिला आहे. तो घेऊन आह्मांस रजा द्यावी. नको तो व्याप; तो जितका करावा तितका जास्तच तापद होणार. आह्मीं असल्यामुळें तुमच्या कारभारांत जी दुफळी होते ती कशाला? आह्मांलाच रजा द्यावी; ह्मणजे सर्व सुरळीत चालेल. हे मीं आपले बरोबर सखारामबापू वगैरे आमच्या पक्ष मंडळाचेही राजीनामे आणिले आहेत. तेही मान्य करून त्यांस आजमितीपासून रजा द्यावी.

माधव०—दादा, त्याचा एवढा राग कशास पाहिजे? जें झालें तें गैरवाजवी झालें असेल तर आपणच माझा कान धरा. आपण आपला एक पक्षीय अभिप्राय दिला; परंतु एक घाव दोन तुकडे कसे करावे; कांहीं तरी विचार केला पाहिजे. इकडे निजामअल्लीची समजूत न करावी तर हैदर. थोडेंसें डोकें वर उचलीतच आहे; तेंव्हां त्याच्या डोक्यावर दडपण दिलेंच पाहिजे. त्यांत बहुमत कीं निजामअल्लीची समजूत करून त्यास कसेंतरीं वाटेस लावावें. आतां ते प्रांत व ती खंडणी मिळविण्यास वास्तविक मराठ्यांस किती तरी परिश्रम पडले असतील? परंतु दोन दरडींवर पाय दिला ह्मणजे खचण्याची फार भीति असते; ह्मणून ही तजवीज केली व ती सर्वानुमतें पसार झाली. ही जर चूक असें आपल्या मतानें वाटत असेल, तर त्याबद्दल मी आपली क्षमा मागतों. गोष्ट होऊन चुकली, आतां इलाज नाहीं.

दादा—( दीर्घ धारा सोडून ) असो, तुमची मर्जी. सत्तेपुढें शहाणपण फिकें आहे. कारभारा संबंधानें आह्मीं आतां गोष्ट देखील काढणार नाहीं.

माधवराव—( आपल्याशीं ) मूळ मुद्दा झुकला आणि आतां गृहच्छिद्राच्या मागें दादा लागले. असो आतां. आपल्यासही तो पंथ

मुखांतून उत्तराचा रोख बदललाच पाहिजे. ( उघड ) दादा, आपल्या शुद्ध अंतःकरणांत द्वैतरूपी मलाचा कोणीं शिरकाव करविला असेल देव जाणें. सत्ता ती काय दोन दिवसांची, ती मी कोणावर बजाविली व तिचा परिणाम काय भयंकर झाला हें माझ्या तर लक्ष्यांत येत नाहीं. वडिलांनीं मरते समयीं मला तर आपल्याच स्वाधीन केला आहे व त्या वडिलांच्या शब्दांस मान देऊन आपण मला लहानाचा मोठा करून मला चांगल्या मार्गास लाविलें, हें आपलें आपण कर्तव्यकर्म योग्य रीतीनें बजाविलेंत असें सर्व जग ह्मणतें आहे. सत्ताधारी एक परमेश्वर; आपण निमित्य मात्र आहोंत. मी ह्मणजे आपल्यास सांगावें असें नाहीं. घरांतील घोंटाळे हे सर्वत्र आहेतच ते कधीं चुकावयाचे नाहींत. कोळसा जितका उगाळला तितका तो काळाच. आपण कारभाराकडे तिळमात्रही लक्ष्य देऊं नये. परंतु दरबारांत खुशाल रोज येऊन बसण्याविषयीं माझी आपल्यास सविनय विज्ञाप्ती आहे.

**दा०**—माझी आतां कांहीं सुद्धां इच्छा नाहीं. खुशाल हरी हरी ह्मणत एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं जाऊन रहावें, एवढाच हेतु आहे.

**माधव०**—आपण धनी आहांत व माझे वडील आहांत. आपल्या मर्जीस येईल तसें करावें. पण दादा, माझ्या एकट्या मुळेंच आपल्यास हे निरर्थक कष्ट कां व्हावेत. मीच आपला कोठेंतरी जातों ह्मणजे सर्वच आटोपलें. ( आपल्याशीं ) आमची तब्यत ह्मणजे अगदीं बेभरंवशाची. कफ तर सदाकदा आहेच, त्यांतून पाठीमागें ही किर किर. वैभव दैवयोगानें मिळालें आहे. भोगूं तेव्हां खरें; नाहीं पेक्षां

**श्लोक.**

आला आला प्राणि जन्मासि आला ॥
झाला झाला वाढला थोर झाला ॥
केला केला व्यापही सर्व केला ॥
गेला गेला बापडा व्यर्थ गेला ॥

दा०—बाबा तूं आपला फारसा नांद आणि प्रजेला सुख दे. मी येतों आतां (जातो.)

माधवराव—(आपल्याशीं) या संसारांत मनुष्यास तिळमात्र देखील सुख नाहीं, परंतु हा प्राणी पहा किती लोंचट आहे तो! जाऊन फिरून त्यांतच रममाण होतो. राज्यपद ह्मणजे निर्भय, सुखाचें साधन, विष्णुपदच होय. परंतु माझ्या मतें तें अनेक भयांनीं युक्त, अनेक दुःखांचें साधन असें आहे. राज्यांतीं नर्कवास ह्मणतात परंतु तो राज्यावर असतांनाच अनेक कारणांनीं प्राप्त होतो. दादांच्या मनांत अर्धा हिस्सा पटकवावा मग स्वस्थ बसावें. ठीक आहे दादा साहेब! आपली मर्जी, (श्वास सोडितो) असो या राष्ट्रनौकेला योग्य मार्गानें चालविण्यास नामांकित सुकाणूं धरणारे मिळविण्यास लागावें हें बरें, स्वस्थ बसण्यांत काय अर्थ आहे? ज्यांनीं हें मराठी राज्य स्थापण्यास आपल्या देहास चंदनाप्रमाणें झिजविलें त्यांच्या वंशजांनीं त्या राज्याची नुस्ती व्यवस्था लावूं नये ह्मणजे किती लाजीरवाणें आहे? सुग्रास वळून तोंडांत घातल्यावर आह्मीं हतभागी, तो नुसता गट्ट देखील करीत नाहीं तेव्हां आह्मांस काय ह्मणावें? धिक्कार असो आह्मांला! ज्यांच्या कुळांत जन्म घेतला त्या कुळांत आह्मीं कलंक लावायास कसे निपजलों? आह्मीं अविंधांपासून आपली आर्यमाता अशा भांडणांनीं व आपसांतल्या दुहीनें कशी मुक्त करणार? थोरले छत्रपती कैलासवासी शिवाजी महाराज, यांचा शब्द आह्मीं कसा पुरा करणार? यापेक्षां जन्मतांच मरण आलें असतें, तर फार उत्तम झालें असतें. नको तो व्याप आणि नको तो प्रपंच; नको तें राज्य! फारतर काय (?) तो जीव सुद्धां नकोसा झाला आहे. ईश्वर या संकटांतून आह्मांस कधीं मुक्त करील तो करो. (इकडे तिकडे पाहून) बोलण्यांत वेळ बराच गेल्या मुळें भान राहिलें नाहीं. दरबारांत सुद्धां जाण्याची वेळ होत आली. चला जावें आतां. (जातो.) (पडदा पडतो.)

दरबार. ( पडदा उघडतो. )

[ माधवराव, त्र्यंबकराव मामा, नानाफडनवीस, रामशास्त्री व आणखीं कांहीं मंडळी बसली आहे. ]

**माधवराव**—दादांनीं अखेरीस कारभारांतून आज तारखेपासूनच आपलें मन काढलें हो; खुशी त्यांची. या कामांत मी तरी आग्रह कशास धरूं? कां मामा खरें कीं नाहीं ?

**त्रिंबकराव**—दादासाहेबांनीं हें बरें केलें नाहीं. उगाच हट्टास पेटून अखेरीस त्याचा असा परिणाम करावा हें बरोबर नाहीं. कां शास्त्रीबुवा ?

**शास्त्रीबुवा**—वयोवृद्ध तशांत सरकारास पित्याचे ठिकाणीं असतां दादा साहेब यांचें याकामीं झालेलें वर्तन अत्यंत दोषास्पद होय. क्षुल्लक बाबतींत योग्यायोग्य विवेक न करितां एकदम असा अविचार करणें प्रशस्त नाहीं.

**माधवराव**—बरें मग पुढें कसें काय करायाचें? माझ्या मनांत दादांस फिरून कारभार करावयास या असें बोलावयाचें नाहीं. आले तर खुषी न आले तर कांहीं अडत नाहीं. शास्त्रीबोवा, या कामीं आपला कसा काय सल्ला आहे?

**शा०**—या कामीं मला एकच उपाय दिसतो तो हा कीं, सरकारानीं यथा न्याय वागणारा, लोक प्रिय, असा गृहस्थ पाहून त्याचे हातीं सर्व राज्याचा कारभार द्यावा. आणि ज्यांच्या त्यांच्या अक्कल हुशारी प्रमाणें बाकी सर्व कामें त्यांचीं त्यांस द्यावीं. या कामास विलंब कशास पाहिजे ?

**माध०**—शास्त्रीबोवांचें ह्मणणें आह्मांस सर्वस्वी मान्य आहे व ते आमच्या गुरुच्याच ठिकाणीं आहेत. तेव्हां त्यांहीं सुचविल्या प्रमाणें मी तजवीज करितों. ती अशी कीं, मामा साहेब यांहीं सर्व राज्याचा

कारभार पहावा. न्याय खात्या संबंधेंही न्यायमूर्ति आमच्या सुदैवें करून आह्मांस लाभलीच आहे. बाकी नाना वगैरे आपलीं कामें पूर्वीपासून करित आहेत त्याप्रमाणें त्यांहीं करावीं.

त्र्यं०—आज्ञे प्रमाणें सर्व कांहीं व्यवस्था आह्मीं करितों. आपली आज्ञात्र प्राधान्य आहे. एकटे दादासाहेब व बापू नसले ह्मणजे पेशवाईचा आजच अंत झाला असें ते समजून आपल्या मनांत गाजरें खात असतील तर खुशाल खावोत. परंतु या शरीरांत जावत्काल पर्यंत प्राण संचार करित आहेत तावत्काल हा देह या गादीचे ठायीं कधींही निमकहराम होणार नाहीं. पाया मजबूत असल्यावर इमारतीस कशाची भीति असावयाची ? खाल्लच्या घरचे वांसे मोजणारी मंडळी या राज कारभारांत काय कामाची ? खरोखर असले विश्वासघातकी, कपटी, दुराग्रही मनुष्य राज्यांत ठेवण्यापेक्षां त्यांची योग्य तजवीज लागली तर बरी होईल.

माध०—मामा काय सांगूं, तुमच्या ह्मणण्याप्रमाणेंच केलें असतें; परंतु आमचे दादा भोळे; त्या कृत्येला भाळल्यामुळें हे सर्व घोंटाळे आहेत. वडिलांच्या इच्छेप्रमाणें हे मोंगल थोडेसे दबले, कीं मग घरच्या व्यवस्थेला लागलोंच असें समजा. हो पण त्या निजामअल्लीला थैली पटून तो गार झाला कीं नाहीं ?

त्र्यं०—त्याची रावसाहेबांस काळजी नकोच आतां. जरा कुठे खालीं वर हैदर डोकें करित आहे परंतु त्याचें डोकें फोडण्याचें काम मींच पत्करितों, आपली आज्ञा मात्र असावी.

( पडद्यांत भोजनाची वेळ झाली असें पुकारतात. )

माध०—असो, आतां सर्व व्यवस्था तुमच्या मर्जीप्रमाणें झालीना ? हैदर ह्मणजे आपल्यास फार आहे असें नाहीं, तरी त्याविषयीं उद्यीक विचार करून स्वारीस जाण्याचें करूं. सर्व सुखी असोत व या राज्याचा चिर-

काल उपभोग घेवोत ही माझी इच्छा परमेश्वर सफल करो, ह्मणजे झालें. बरं जा आतां तुह्मी सर्वजण.

सर्व—आज्ञा ( जातात ) ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था.

### ( रंग महाल. )

( रमाबाई पलंगावर निजली आहे व दासी जवळ उभी आहे. )

( पडदा उघडतो. )

**दासी०**—( पुढें होऊन ) बाईसाब ह्मणावं तर आमच्याच बाई सायबांसनीं, नाहीं तर समद्याच बाईसाब नी काकूसाब जवां यावं तवां अक्षी महाराजांचं समरण, दुसरं त्यानां नाहींच. जशी श्रीरामाची सीता, नलाची दमयंती, तशा बाईसाब पण आमच्या खऱ्या खऱ्या पतिवर्ती; आह्मीं चाकुर माणुस पण जशी माय मावलीवानी आमच्या खान्या पिन्याची, आन् समद्या परकारची व्यवस्था, कशी लेंकरावानी. देवा, आमच्या महाराजांचा आणि बाईसायबांचा जोडा अक्षी सुखी असो. ह्मंजे आमासनी काय कमी? ( रमाबाईकडे पाहून ) बाईसाब निजल्याती तरी त्वांड जनुं हसतंच, जसी चंद्राची चांदनीच. ( इकडे तिकडे पाहून ) लय रात झाली पन म्हाराज कां न्हाइ बरं येत. ( निरखून पाहून ) त्यो बगा चंद्रमा उगवल्या परमानेंच ह्माराज हे आलेच. बाई साबबी हालल्याती, तंवा आपुन जावं ह्येच बेस. ( जाते ) माधवराव—( जवळ जाऊन हळूच ) कां झोंप लागली वाटतं; उठतानां!

**रमा०**—( चकीत होऊन आपल्याशीं ) स्वारीचं येणं केव्हां झालें हें मला ठाऊकही नाहीं. ( पाहून प्रेमानें भेटतात. दोघेही बसल्यावर ) आप्पा मघांच सांगून गेले कीं कांहीं जरूरीचें काम आहे करितां स्वारीस येण्यास अम्मळ वेळ होईल. ( हंसत ) मग झालं का काम कमलं होतं तें?

माधव०—( थट्टेनें ) तुह्मांला त्याची काय जरूर; सरकारी कामांत बायकांना काय समजतें ?

रमा०—बरं तर मर्जी. ( स्वस्थ बसते )

माधव०—व: राग आला वाटतें ? त्याला काय ? तो बरा नाका वरच बसलेला असतो. थट्टा नाहीं का समजत ? ( जवळ जाऊन ) हें पहा !

र०—( हात लोटून रागानें ) ही काय मेली अशी थट्टा. आधीं माणसाचा हिरमोड करायाचा आणि मग ह्मणायाचें " थट्टा नाहीं का समजत " ? आपण मेलं आपलं भोळ्या भावानें विचारावं आणि इकडे त्याचं कांहींच नाहीं. ( थोडीशी दूर बसते. )

माधव०—( थट्टेनें ) अहाहा काय भोळी; बाहेरून मात्र खरी भोळी—पण आंत पक्की काळी. तीं बिचारीं आनंदीकाकू ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. बायकांनीं ह्मणजे घरभर तंटे लावावे आणि नवऱ्यास आपला गुलाम बनवावें, ह्मणजे त्यांना वाटतें आह्मीं धन्य ! !

र०—( डोळ्यांस पाणी आणून उठून ) कोण मेल्या अवदसा घ-रांत तंटे लावून नवऱ्यास गुलाम करीत असतील त्या करोत. ( गहीं वरून ) नको हो नको, माझ्याच्यानें हें बोलणं नाहीं आतां सहन कर-वत. बिचारी आनंदीकाकू जेव्हां एखादे वेळीं घराचें बरोबर करील तेव्हां डोळे उघडतील. परमेश्वर माझें गाऱ्हाणें लौकर ऐको ह्मणजे मी जिंकलें. ( स्फुंद स्फुंदून रडूं लागते. )

माध०—( आपल्याशीं ) आतां मात्र थट्टेचा कळस झाला. ( उठून पोटाशीं धरून ) लाडके, घटकाभर गम्मत करितां करितां अखेरीस तुझ्या गाई पाण्यावर आल्या नां ? काय बरें हें ? बरं तर आतां तुला इत्थंभूत हकीकत सांगतों, मग तर सर्व रागाची शांती होईल नां ? ( तिला पलंगावर बसवितो व ती उठते ) छे बुवा असें नाहीं. तुह्मीं ब-सल्या खेरीज मीही बसत नाहीं. ( तिला पुन्हां पोटाशीं धरतो. )

र०—( किंचित हंसून तिरव्या डोळ्यानें ) अहाहा, काय काय मेली ही गम्मत जीव घेण्याची. दुसऱ्याचा जीव गेला तरी इकडे गम्मतच असायाची. आह्मीं किती केल्या तरी परवऱ्या, आह्मांला काय माया ममता आहे ? काय ती ममता, प्रीति, सगळी सख्या आनंदीकाकूंसच.

मा०—बरं तर मग आतां ऐकतेसनां, कीं, भांडत बसाः—( अर्धवट तसेंच दाबतो. )

र०—मी ऐकण्यास तयारच आहें. एव्हां सर्व हकीकत आटपून अर्धी झांप सुद्धां झाली असती; पण ही गम्मत कशी झाली असती ?

मा०—बरें जाऊंदे आतां. आज सकाळीं येथून उठून गेलों तों दादासाहेब दाराशींच उभे; मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेऊन नमस्कार केला. नंतर कां आलां वगैरे विचारतांच, "हा घ्या आमचा राजीनामा, आह्मी कारभार पहात नाहीं. व आह्मांला कशाचीही जरूरी नाहीं. व हे आमच्या तर्फेच्या मंडळींचेही राजीनामे घ्यावेत" असें ह्मणून जाऊं लागले. मी पुष्कळ समजावून सांगितलें, परंतु ते दुराग्रह न सोडितां जास्तच हट्टास पेटून, अखेरीस रागावून, तसेच निघून गेले. आतां तूंच पहा–वरच्या मंडळीची ही स्थिती झाली. तेव्हां पुढें नवीन कारभारी नेमून राज्य चालविलें पाहिजे कां नको ? अर्थात मी त्र्यंबकरावमामास कारभारी नेमून वरकड मंडळींस त्यांचीं त्यांचीं कामें पाहावयास सांगितलें;–शास्त्रीबुवा तर आपले आहेतच. ( दीर्घश्वास सोडून ) प्रिये काय सांगूं ? बाबांना हीं सर्व भविष्यें ठाऊक होतीं ह्मणूनच त्यांनीं अंतकाळचे प्रसंगीं माझा हात धरून दादाच्या हातीं दिला, आणि सांगितलें कीं माधवा पहा बरें ? तुझें पोरवय आहे. दादा पोक्त आहेत, त्यांचें ऐकत जा, त्यांची अमर्यादा करूं नकोस, तुलाच माझ्या पाठीमागें पेशवाई मिळणार; तेव्हां सर्व कारभार तुजवरच पडणार; यवनांस दंड करून हिंदुपद पादशाही राखणें हें विसरूं नकोस. व खुद्द दादांसही सांगितलें कीं

आतां माधव व नारायण माझे नाहींत, हे दोघे तुमचेच आहेत. हे मी तुमच्याच पदरांत घालतों; आतां यांचा संभाळ करा. ( दोघेंही गहिंवरतात. ) कठीण प्रसंग तो ! ! !

र०---येवढं झालं तरी मामंजींनीं जें करावयाचें तें केलंच. पण असं त्यांनीं कधीं कधीं सुद्धां करायाचें नव्हतें.

मा०---अग लाडके, काय सांगू ? दादा म्हणजे केवळ शंभोस्वरूपी आहेत; पण त्या काकूबाईच्या तडाक्यांत सांपडल्या मुळें त्यांची बुद्धी फिरली आहे असें म्हणणें भाग पडतें. नाहीं तर, एरव्हीं दादा म्हणजे भावा करितां प्राण टाकीत असत ! !

र०---सासूबाई तर काय नेहमी फूं फूं जशी कांहीं नागीणच. आमचं वैभव त्यांच्याच्यानं पाहवत नाहीं. आम्हीं परमेश्वरास भिऊन वागतों. त्यांच्या मनांत पाहिजे तें कां असेना ?

माधव०---( त्रासानें ) जाऊं दे बुवा ती कर्म कटकट. या क्षणभंगूर जगांत कोणाला सुख झालें आहे ? जिथे तिथे कांहीं तरी रडकथा आहेतच. राजा पासून रंका पर्यंत एक सारखी तीच.

( पहारेकरी दोहोंचा अम्मल झाला असें पुकारतो, व कोंबडा आरवतो. )

र०---अग बाई, बोल बोलतां रात्र संपत आली. ( माधवरावास ) आतां निजणं नाहीं कां होत. जाग्रणानें तब्यत बिघडेल एखादी. कालच वैद्यबुवांनीं खोकल्यावर मात्रा दिली आहे. व उद्यां ते समस्त तब्यत पहाण्या करितां येणार आहेत.

माधव०---बरं तर निजा आतां. झोंप आली. सच्चिदानंद प्रभो, कृपा कर.

( पडदा पडतो. )

**अंक २ रा समाप्त.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( एक ब्राह्मण प्रवेश करितो. स्थळ—अरण्य. )

हरहर ! ! ! परमेश्वर आतां कितीतरी माझा अंत पाहणार. आज सारखा कित्येक रात्रंदिवस चाललों आहें तरी पुण्याचा मागमूस सुद्धां नाहीं. अन्न पाणी तर, जो भागानगराहून रागानें निघालों तेव्हां पासून लवलेशसुद्धां नाहीं. यवन सीमा जिकडे तिकडेच असल्यामुळें वारंवार त्यांचे हल्ले होऊन हें पहा अंग कसें ठिकठिकाणीं फाटून जाऊन त्यांतून एकसारखें रक्त गळत आहे. नकोरे देवा हा कष्टतर ब्राह्मणाचा जन्म, त्या पेक्षां मरण बरं.

॥ दिंडी. ॥

वनीं कंटक ते रुतति मम पदांसीं ॥
भय प्रद रव ऐकतां दे भयासीं ॥
हृदय कांपे हें भीतिनें थरारा ॥
त्रशांतून— कठिण यवनांचा वाटतो दरारा ॥ १ ॥

बरं मागें तरी काय घोंटाळा असेल कोण जाणे—

( शोकानें )——( काय मला भूल पडली )
पुत्र सुता प्रिय भार्या दूर राहिलीं ॥
देई कोण अन्न त्यांस दीन जाहलीं ॥ ध्रु० ॥
गेलें घर राहण्यास सोय चांगली ॥
अर्भकांस खचित असे भूक लागली ॥
दुष्ट नीच यवनांनीं ठार मारिलीं ॥
हाय हाय काय करूं ? माय माउली ॥

किती हो तो चांडाळ रुस्तमदौला; प्रथम प्रसंगीं त्यानें केवढा तरी मजवर गहजब केला.

साकी.

बद्ध करुनि मज घेउन जातां सेवक फटके देती ॥
मुष्टी मोदक किती चारिले त्यांची नच हो गणती ॥
विचित्र दैवगती ॥ ऐका दुर्वार्ता पुढती ॥ ! ! !

पद. ( जनसारे या चा. )
प्रिय कन्या ममती सुत भार्या ॥
नेतां मातें बद्ध करोनीं ॥
दुष्ट अविधें, अवलोकोनीं ॥
लोळति गडबड गडबड धरणीं ॥
वक्षस्थळ पिटीते आर्या ॥ ! !

पुढें मला दरबारांत बादशहासमोर उभा केला. बादशहाच ते, आह्मांस हुकूम फर्माविला कीं तुमची जागा आह्मांस एक आमचा रंगमहाल बांधण्याकरितां पाहिजे. ती आतांच खालीं केली पाहिजे. नाहीं तर तुह्मांस सजा देण्यांत येईल. ठीक आहे ह्मणून मी तसाच रागानें पुण्यास आलों. श्रीमंतांस भेटतां बंदोबस्त करितों ह्मणून अश्वासन दिलें. पुढें ८ दिवस वाट पाहिली, कांहीं निकाल नाहीं. पुन्हां श्रीमंतांस भेटून तसाच जबाब मिळाला. हा आपला प्रारब्ध योगच असें ह्मटलें पाहिजे. आजचा तर शेवटचा प्रयत्न आहे. श्रीमंतांस भेटून आजच निकाल लावण्यास विनंती करितों. नाहीं पेक्षां पुढें जें काय बनेल तें बनेल— ( दृश्य करून ) अहाहा! किती रमणीय स्थळ हें; संध्याकाळ झालाच, आतां रात्रीचीरात्र विश्रांती करितां येथेंच काढून उदयीक येथून निघून मार्गस्थ होऊं; पुण्यास मुक्कामास जाऊन तेथें अन्न घेऊं असा विचार पक्का झाला होता, परंतु आतां ताकद अगदीं जाऊन येथून हलण्याची सुद्धां शक्ति नाहीं. ( गठडी सोडून ) एक मुठभर पोह्यांची फकी मारून, थोडासा पाण्याचा घोट घेऊन, स्वस्थ वामकुक्षी करावी हें बरें.

( अयाई बये बये करीत जमीनीवर पडतो. )

( इतक्यांत भयंकर वाघाची गर्जना होते, श्वापदें पळण्यास लागून जिकडे तिकडे एकच गोंगाट होतो. )

**ब्राह्मण**—( चकीत होऊन एकदम उभा राहून दुःखानें ) हाय हाय! आतां काय करूं.

**पद** ( प्रतिकुळ होईल कैसा )

सत्य दैव फिरलें माझें सत्य सत्य आजी ॥
आप्त गोत नाहीं जवळी काळ कसा गांजी ॥
क्रूर श्वापदांच्या हातीं मृत्यु मला यावा ॥
नेम प्रखर ऐसा विधिचा काय मला ठावा ॥
मूर्खपणें कांमीं माझा आप्त गण त्यजावा ॥
मत्समान जगिं या कोणीं अन्य नसे पाजी ॥ सत्य० ॥

अथवा यांत माझा काय दोष आहे ?—

**साकी.**

मृत्यु विद्या वित्त कर्महि आयुष्य या पांचांना ॥
श्रीविधि लीहितो प्राणी जेव्हां गर्भी तो असतांनां ॥
लेखन भाळींचें ॥ कोणा चुकेल तें कैचें ॥ १ ॥

( दोन मराठे सरदार शिकारीच्या तयारी सहीत घाईनें प्रवेश करितात )

**जानबा**—बा शाबास शिवबा पठ्ठे गडी, खुप केलीत बहार. आज शीरमंता पासून शिरपेच अन एक कडं तुझ्यासनीं बक्षिस मिळणार खास.

**शिवबा**—काय सांगू जानबा, पन् सावज लय दुवाड बगा. त्यानं माझी भिगरी उडवून दिली कीं राव.

**जान०**—तुमची माझी योक घंटेची चुक भुल, नाहीं तर पघा तुमच्या न माझ्या सारख्या पक्या जवानानीं एका खिणांत त्याला धडाड जमीनीवर लोळवला असता.

**शिव०**—समदं खरं पण पर्संग मोठा वंगळ.

॥ लावणी. ॥ ( चैत्रमास भर उन्हाळ्यांत )

मस्त वाघ तो रेड्यावानीं । तुह्मां आह्मां पाहुनि धांवला रागं गुरगुरुनीं ॥ झाली आपली दानादानी । तुह्मांस मी सोडुनि धांवलों तेच्या माग रानीं ॥ लय रागानं उलट खाउनी । येतानां दोनी, पाय मी धरलं दाबोनी ॥ पोटाचा तो नेम धरोनी । बर्ची भोकसुनी पाडिला धरणीं असडोनीं ॥

**जानबा**—वा शाबासरे जवान मर्दा ( ब्राह्मण कांपत कांपत ) बाबानो तुह्मीं श्रीमंतांचे चाकर काय ?

**जानबा**—जी महाराज होय.

**ब्राह्मण**—बरं तर मला तुह्मीं श्रीमंतांकडे न्याल काय ?

**शिवबा**—हे काय ह्माराज इचारतां ? बामन ह्मणजे शीर्मंताचे जनु परानच आमच्या. बरं आपुन इकड कश्या पाइं आलां आन शीरमंताकड जान्याच कारन ?

**ब्रा०**—बाबांनो काय सांगूं. माझें प्रारब्ध

( ज्यावर मीं विश्वास ठेविला. )

भागा नगरीं त्या यवनानीं । छळीलें बहु परी हालकरोनीं ॥ कांहीं तरी मम दाद लागुनि । ह्मणुनि त्वरें निघुनी ॥ श्रीमंतातें मी विनवोनीं । वृत्त इकडचें सर्व कथोनीं ॥ केली कबुली सर्वही त्यांनीं । मज अश्वासोनी ॥

परंतु काय सांगूं ! ! !

परि अद्यापि नाहीं कोणी । आला रिपुवर चाल करोनी ॥ होईल कैशी गति ती ह्मणूनी । चैन नसे स्वमनीं ॥

**शिवबा**—महाराजांनीं अगदीं भिऊं नये. शिर्मंत जाऊन अक्षी त्यां नोडग्यांची खोडच मोडतील. तर चलाकी जावूं आपन आतां पुन्याला.

**ब्राह्मण**—( डोळ्यांत आसवें आणून आपल्याशीं ) ज्या आशेवर त्या भागा नगराहून तडफडत निघालों ती माझी आशा परमेश्वर सफल करो ( उघड ) बरं तर चला आतां. ( जातां जातां )

( रजनीं नाथ हा )

सुमंद शीतल पवन सुटोनी । होई कितीही सुखद यामिनी ॥

शीतरश्मीचा उदय जहाला । निबिड वनींया दीपचि गमला ॥
मार्गींचा श्रम अल्प वाटला । दुःखानळतो जाय विझोनी ॥

( सर्व जातात. )

( ब्राह्मण व मागील दोन मराठे प्रवेश करितात )

**शिवबा**—महाराज, आज सरकार स्वारी इथंच मुक्कामास हायती. आतां पुन्यास कशापायीं जाणार ? ह्मराजांस भेटून इथच्या इथच ह्या सम्द काइ करून मंजे झालं.

**ब्राह्मण**—दिनाचा परमेश्वर साहकारी, सर्व योग कसे सहज जमून येत आहेत. अशीच सर्व कार्यसिद्धी होवो ह्मणजे मी कृतार्थ झालों.

**शि०**—होनारच, तुमी सवस्थपनानं शिरमंताच्या तंबुकड नीट ह्मोर जावं. आमी बी मागून तकडच येतो.

( शिवबा आणि जानबा जातात )

**ब्राह्मण**—( इकडे तिकडे फिरून ) श्रीमंतांचा तंबू हाच असावा आणि आपल्यास आंत प्रवेश करण्यास कोणी प्रत्यवाय करणार नाहीं. ( आंत जातो )

( माधवराव स्नान संध्या उरकून ध्यानस्थ बसले आहेत )

असा पडदा उघडतो.

**माधव०**—( ध्यान विसर्जन करून ) परमेश्वर प्रभो भक्तवत्सला कृपा कर ( असें ह्मणतो )

**ब्राह्मण**—( मोठ्यानें परंतु निराशेनें ) राजा, या गरीब ब्राह्मणास विसरलास काय ?

( शशिकुल भूषण गुणवंता )

यवनें बहुतां परि छळिलें ॥ ह्मणुनी तुजला प्रार्थियलें ॥
तूंही अश्वासुनि मजला ॥ मनाला धीर जरा आला ॥
पुरविलें नच तूं वचनाला ॥ यवन त्यामुळें मत्त झाला ॥
टाकुनि प्रियसुत वनितेला ॥ आलों तुज कळवायाला ॥

ब्राह्मण्याचा लोप जहाला ॥ आर्य राज्य बुडलें ॥
राजा काय असें केलें ॥ १ ॥
राजा, प्रजाजना विषयीं एवढा निष्ठुरपणा काय कामाचा.
(तेचि पुरुष दैवाचे या चा०)
यवन करीं गेलीं बाळें ॥ काय तयांची गतिहो झाली ॥
अन्नावांचुनी जीं तडफडलीं ॥ किंवा यवनें ठार मारिलीं ॥
नेउनि रानीं किंवा त्यजिलीं ॥ कोण त्यांस वाली ॥ य० ॥

आज हिंदुपद पादशाही जिचा नुसता यशोदुंदुभी सर्वत्र गाजतोहे, आणि यःकश्चित एका गरीब ब्राह्मणाची दाद लागून, त्या चांडाळ अविधा पासून, त्याची सुटका होऊं नये ह्मणजे मोठ्या सखेदाश्चर्याची गोष्ट ह्मटली पाहिजे. श्रीमंत, आपण स्वस्थ कां बसला? माझा बंदोबस्त करा, नाहीं तर मला जाण्याची आज्ञा द्या. खरोखर ब्राह्मण्य बुडालें, बुडालें, बुडालें, असें त्रिवार नाहीं, परंतु हजार वेळ सुद्धां तुमच्या पुढें ह्मणणें मला भाग आलें. (दीर्घश्वास सोडतो) दोन दगडींवर हात ठेवल्यामुळें अखेर आपल्याशीं इकडेही आधार नाहीं व तिकडेही नाहीं. परमेश्वर इच्छा!!!

साकी.

बलवंतासीं स्पर्धा स्वजनीं विरोध करणें कैसा ॥
अनुचित कर्मा रंभ नयोग्यचि प्रमदा जन विश्वासा ॥
घडतां गोष्ट अशी ॥ मृत्यू समीप ये त्याशीं ॥!!!

**माधव०**—(त्वेशानें) महाराज आपण इतके निराश कां होतां? मोंगल ह्मणजे काय पदार्थ आहे? हा आपला छळ झाला नाहीं तर माझाच झाला असें मीं समजतों. मीं सामोपचारानें ही गोष्ट करण्यास पहात होतों, परंतु त्या दुष्ट अविधानें त्याजकडे लक्ष्य दिलें नाहीं. असो, कांहीं हरकत नाहीं; आजच्या आजच याचा बंदोबस्त करून, त्याची खोड तोडून टाकतों. तुह्मी येथेंच स्वस्थ बसावें, ज्या वेळेस पेशवाईचीं वस्त्रें

मिळालीं त्या वेळेसच अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, गो–ब्राह्मणांचें प्रतिपालन करीन व हा देह सदा देश–कारणीं झिजवीन. तो चांडाळ नबाब त्याला पायां पडावयास न लावीन तर नांवाचा माधवरावच नव्हे. (आपल्याशीं) धिक्कार असो आह्मां ब्राह्मणांना! ज्या कुळांत जन्म घेतला त्यास कलंक लाविला. गरीब बिचाऱ्या ब्राह्मणाचा नाहक त्या अविधानें छळ केला असतां त्याची आह्मीं दाद घेतली नाहीं. धिक्कार ! धिक्कार असो ! (इकडे तिकडे पाहून रागानें ) कोण आहे रे तिकडे.

पहारेकरी ( पुढें होऊन )–जी सरकार.

माध०—आतांच्या आतांच निळकंठराव पागे यांस मी बोलाविलें आहे ह्मणून सांगून त्यांस घेऊन ये.

प०—जी हुकूम. ( मुजरा करून चालता होतो ) ( कांहीं वेळानें निळकंठराव पागे, सर्व तयारीनिशीं प्रवेश करितात. )

नि०—( मोठ्या अदबीनें मुजरा करून ) सरकार आज्ञे प्रमाणें सेवक चरणीं हजर झाला आहे, काय ती आज्ञा व्हावी ?

माधव०—निळकंठराव, तुह्मी आतांच्या आतांच मोंगलाई मुलखांत जावें, व जेथून मोंगलाई मुलूख लागेल तेथपासून पुन्हां दिवे लावणीचा कौल देत, असें करावें. या कामा करितां तुह्मांस जो सरंजाम पाहिजे तो मी पुण्यास जातांच पाठवून देतों. शिवाय इतर मंडळीस तुह्मांस पंढरपुरास येऊन मिळण्या विषयीं ताकीद पत्रें लिहितों. जेणें करून तो चांडाळ हाय हाय करण्यास लागून धाय धाय रडत दाद मागण्यास इकडे धांवतच येईल–चला निघा कसे.

निळकंठ०—आज्ञा सरकार ( मुजरा करितो. )

माध०—यशस्वी होऊन लवकर या.

निळकं०—( मोठ्या त्वेषानें ) ह्मा‌ळसा कांताच्या कृपेनें व सरकारच्या पायांच्या पुण्य प्रतापानें हां हां ह्मणतां त्या बेशरम नेभळ्याला दांतीं तृण धरावयास लावून या चरणीं हजर करितों. ( जातो. )

माधव०---महाराज, चला आतां आपण थेऊरास श्रीगणपतीचे दर्शनास जाऊं; व तेथून तावडतोब पुण्यास येण्या कारितां निघूं. आपण आतां बेफिकीर रहावें. ( जातात. )

( पडदा पडतो. )

( अंक तिसरा समाप्त. )

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( रमाबाई चिंतातूर बसली आहे, जवळ दासी उभी आहे. )

र०—( आपल्याशीं ) स्वारी आज यावीच असा खास बेत होता, अद्याप कां बरें येणें होत नाहीं ? खरंच बाई ती गरीबी किनई पतकरली परंतु ही श्रीमंती नको. यांत सतरा कुलंगडीं आणि अठरा घोंटाळे असतात. लोकांनां मात्र वाटतं कीं अमके तमके काय राजे आहेत, त्यानां काय कमी ! पण त्याच्या पायीं हाडन हाडें खिळखिळीं होतात. बी पाहिलं पण वडवा कुठं पाहिला. बरं मेल्या काळज्या तरी किती ? त्या एका मागें एक उभ्याच.

( श्रीहरिच्या वेणुनादें. )

क्षणभरही झोंप नाहीं चित्ताला स्वस्थतां ॥
खाण्याला वेळ नाहीं दिन जातो धांवतां ॥

बरं तव्यत तरी चांगली ह्मणावी तर ?

कफ मेला रात्र साधी झाली निशक्तता ॥
निर्धनता चांगली ती नच बरवी सधनता ॥

नेहमीं तरी अशी धांव धांव मेली काय कामाची. प्रवासांत जसा प्रसंग येईल तसं वागलं पाहिजे. कधीं वेळेवर खायाला आहे कधीं नाहीं. थंड पाण्याचीं स्नानें घडणारच. तिथें कोण अगत्यानें सांगणार आहे,

आपणच सर्व कांहीं. आमचा मेला बायकांचा कांहीं तरी उपयोग आहे का ? घरांत बसावें आणि या काळज्या मात्र कराव्या. दुसरं मेलं आमच्या हातीं काय आहे ? बाहेरचे उपद्व्याप काढून घरांत तरी मेलं सुख--पण तेंही नाहीं.

( बल सागर तुह्मीं वीर )

भोळे आमचे मामंजी शिव पार न ममतेला ॥
सासूबाई कठिण मनाची सौख्य नहो त्यांला ॥
वैभव मोठें पाहुनि आमचें चोळिती हस्तांला ॥
आग लागतां पाहिन कधीं मीं ह्मणतें सकलांला ॥
निर्दयतेची पुतळी केवळ असतांना अबला ॥
गुंडाळुनियां पतिला ठेवी झाली ती प्रबला ॥

परंतु कावळ्याच्या शापानें कुठं ढोरें मरत असतात ?

असतां पाठी--राखा प्रभुवर भीती कशाला ॥
फिरतां परितो उपाय नचले नाशी जगताला ॥

दासी---बाईसाब, सरकार सवारी आल्याच पत्ता.

रमा०---( किंचित हंसून ) बरं तर मग तूं जा आतां. ( उठून उभी रहाते. )

( माधवराव प्रवेश करितो )

र०---( हंसत ) आजबाई एवढा उशीर कशाला झाला ! एक तिळभर सुद्धां विश्रांती घेणं नाहीं आणि मग ह्मणायचं तब्यत बिघडली !!

माधव०---अग वेडे तुला काय ? जेवायचें आणि घरांत बसायचें; आमचं तसं चालेल का ? आमच्या मागं अनेक व्याप. ( थांबून ) ते पहा भटजीबुवा इकडेसच येत आहेत त्यानां नमस्कार कर हो ?

( भटजी येतात )

( रमाबाई नमस्कार करितात ) ( भटजी आशिर्वाद देतात ) ( स्नानाची तयारी झाल्या बद्दल आंतून वर्दी येते. )

माधव०—( ब्राह्मणास ) आपण स्नानास चलावें. मीही आपल्या मागून येतोंच. ( ब्राह्मण जातो. )

र०—कोणबाई हे बराबर असायचे ?

माधव०—आहे बिचारा गरीब ब्राह्मण. त्याचें कार्य सिद्धीस गेल्यावर मग मी तुला याची हकीकत सांगेन हं. ( हंसून ) बरं कसं काय आतां मोहिमेची तयारी करायची; प्रवास तर फारच लांबीचा, डोंगर, नद्या, दरीं खोऱ्यांतून रस्ता, सर्वच गम्मत उडणार आहे; पण आपली परवानगी मिळेलनां ? आज नाहीं हो—पण दोन चार दिवशीं ?

र०—परवानगी ती काय द्यायची. पण गडे, मला बरोबर न्यावी ह्मणजे ठीक; नाहीं तर दुसरी एक युक्ती. हें पहा, तिकडे गेलंच पाहिजे असं कांहीं नाहीं. एवढे मोठमोठे सरदार शिपाई आहेत त्यानां नाहीं का लढाई करवत. प्रकृत बिघडली आहे, खोकला करितो, डोकें दुखतें, तिकडे जायचं झाल्यावर धड खाणं नाहीं, घेणं नाहीं, थंडा पाण्याची आंघोळ, पित्त होईल, आणि मग--( थांबून ) मी नाहींगबाई इथं कधीं राह्याची. मी आपली येणारच.

माधव०—वेडी तर नाहींसना तूं ? अग तें काय आपलें पुणें लागलें आहे तिकडे ! दिवस रात्र मारामारी आणि धराधरी चालणार आणि तशांतून तूं असें करणार, तूं आपली खुशाल येथें रहा. गडी माणसें सर्व तुझ्या सेवेला आहेतच. खेरीज कांहीं कमजास्त वाटल्यास आपले शास्त्रीबुवा आहेतच, आह्मीं सर्व लवकरच परत येऊं. कमजास्त मजकुराचीं पत्रें वारंवार इकडे येत जातीलच, त्या वरून तुला सर्व कळेल. बरं मी गेलों, आणि तूंही मजबरोबर आलीस, ह्मणजे इकडची व्यवस्था कोण पहाणार ?

र०—पुरे पुरे हो. मनांतून नेण्याचें नाहीं, मग इतकी लाडी गोडी कशाला ? हरभऱ्याचें झाड एखादें मोडेल हो ? ( रुसते )

माधव०—हें काय बरें असें. डामडौल चैन भोगायला आपण

आणि लढाईच्या वेळेस दुसरे कां बरें असावेत? केवळ आह्मांलाच ह्मणजे तरवार गाजविली पाहिजे असें नाहीं. आपले एकेक वीर महावीर घसरले ह्मणजे शत्रूंचा तेव्हांच चेंदा उडवून टाकितील.

र०—बरं पण अद्याप ४।५ दिवसांचा अवकाश आहेनां?

माध०—हो तर. दरबार आज भरून सर्वांनीं तीन चार दिवसांत निघण्याची तयारी करावी अशी ताकीद देतों ह्मणजे झालें.

र०—मला नाहींचना न्यावयाची? मी वेडी ह्मणूनच हट्ट धरून बसल्यं दुसरें काय?

माध०—( तिला पोटाशीं घेऊन ) वेडी कशी? रमाच खरी; बाहेर कितीही त्रास होवो, मन कितीही उद्विग्न होवो पण मंदिरांत आल्यावर कसें रमून जातें. खरोखर पूर्वजन्मीं माझ्या पुण्यांशाचा बराच सांठा ह्मणूनच अशी सुलक्षणी रूपसंपन्न कुलीन बायको मला मिळाली, नाहीं तर आमच्या घरांतलेंच उदाहरण—लांब कशाला पाहिजे!

र०—बरं आतां यायचें नां आंघोळीला.

मा०—होतर, चला. माझी तयारी आहे. तुह्मीं ह्मणाल तसें.

( जातात. )

=======

## प्रवेश २ रा.

( माधवराव जेवून पान सुपारी खात बसले आहेत, )

असा पडदा उघडतो.

( नंतर चिंतातूर असा ब्राह्मण प्रवेश करितो. )

ब्राह्मण ( आपल्याशीं )

( लहान वस्तु ती स्थुल दिसली, ) या चा०

फौजा गेल्या आपरमिती ॥

यवना ताडण त्या करिती ॥

भरंवसा वाटे बहु चित्तीं ॥

चाल. ॥ चैन जिवाला तिळभर नाहीं ॥
झोंप न दिन रातीं ॥ ध्रु० ॥

( पहारेकऱ्यास ) कोणरे बाबा तूं; अरे श्रीमंत आंत आहेत काय?

पहारेकरी—होय, आहेत महाराज. असें जावें, ( आपल्याशीं ) श्रीमंताच्या मागें हें एक सुदर्शनच्च अलीकडे लागलें आहे; जेवणाला, खाण्याला, निजण्याला, सर्व ठिकाणीं आपला पुरून उरला आहे. भटजीबुवा इकडे कशाला आलां कोण जाणे आपला मुलूख सोडून ! उगीच्च आह्मांला त्रास मात्र. ( दचकून मागें पाहून ) ओंवाळलेना पण, नाहीं तर श्रीमंतांस जाऊन सांगावयाचा कीं आमची चांदीच झाली.

मा० ( ब्राह्मणांस पाहून ) या महाराज असे बसा, ( आपल्या शेजारीं त्यांस घेतो. ) आज नेहमीं पेक्षां चिंतातूर कां बरें दिसतां—

ब्रा०—राजा, या हृद्रोगावर उक्त रसायण तूं दिलेंच आहेस, पण त्याचा अद्याप नाहीं ह्मणून.

मा०—महाराज, आतां त्या विषयीं आपण कशाला काळजी करितां ! सर्व शक्तिमान प्रभु त्याला सर्व काळजी आहे. आज बहुतकरून शत्रुंचा पराजय झाल्याची नक्की बातमी आपले सांडणी स्वार आणतीलच; आपण स्वस्थ असावें.

ब्रा०—ठीक आहे. तुझ्या आज्ञेप्रमाणें. ( दीर्घ श्वास सोडतो. )

( पहारेकरी लगबगीनें प्रवेश करितो. )

पहारेकरी—( हात जोडून ) सरकार, सरकार, निजामाकडील वकील आले आहेत, ते आंत येण्याची आज्ञा मागतात.

मा०—जा, जा, आणि त्यांनां लवकर घेऊन ये इकडे. ( भटजीस) महाराज हें पहा प्रत्यंतर. तुमचा कार्यभाग झाला असें समजा.

( वकील राजास नमस्कार करून उभा राहतो )

मा०—या बसा. कशीकाय हाल हवाल.

व०—नवाबसाहेबांनीं मला श्रीमंतांकडे पाठविलें आहे. त्यांचा

उद्देश असा आहे कीं, श्रीमंतांकडील मंडळीनीं, आमच्या मुलखांत धामधूम मांडली आहे, याचें कारण केवळ एका ब्राह्मणाची जागा आमचे दिवाण—साहेबांनीं, बंगला बांधण्यांस घेतली ह्मणून; दुसरें कांहीं नाहीं. श्रीमंतांचा व आमचा कोणतेही प्रकारचा बेबनाव नसतां, असें कां झालें समजत नाहीं. पुष्कळ तपास करितां, श्रीमंतां—कडील दोन चार पत्रें ब्राह्मणाची जागा त्यास द्यावी, अशा मजकुराचीं आलीं, परंतु मशारनिल्हे दिवाण साहेब यांनीं तीं मधल्या मध्येंच दाबिलीं; या कारणानें आमचे नबाबसाहेब दिवाण बाहादूर यांजवर रुष्ट झाले आहेत. आतां श्रीमंतांचे चरणीं एवढीच विज्ञाप्ति आहे कीं, आमचे नबाबसाहेब श्रीमंतांच्या मर्जी बाहेर नाहींत; तरी आतां पासून पूर्वी प्रमाणें स्नेह असावा अशी त्यांची इच्छा आहे.

मा०—आतां ठीक—तुह्मीं ह्मणतां त्या " ब्राह्मणाची जागा त्याची त्यास द्यावी. त्यास कोणतेही गोष्टीचा उपसर्ग नसावा. काळ आमचा कमजोर झाल्यास ब्राह्मणास उपद्रव लागूं नये. अशाबद्दल नबाब याजपासून कुराण उचलून घ्यावें. फौज आमची तिकडे बंदोबस्तास गेली आहे, तिचा खर्च आपले खुशीनें ते देतील तो द्यावा ह्मणजे फौजा माघारीं बलावून घेऊं. "

व०—श्रीमंतांचें ह्मणणें आह्मांस सर्वस्वी मान्य आहे.—नबाबसाहेबांनीं भटजी महाराजांस बरोबर घेऊन येण्याची मला आज्ञा केली आहे ?

मा०—आह्मीं डाकेंतून पत्र आज रवाना करितों. तुह्मीं सर्व तयारी करावी. महाराजांचीही रवानगी आपले बरोबर करितों.

व०—( नमस्कार करून ) मला येण्याची आज्ञा ?

मा०—यावें.

( नमस्कार करून निघून जातो )

भ०—राजा, माझे सर्वत्र मनोरथ परीपूर्ण झाले, आता मला जाण्याची आज्ञा दे.

मा०—महाराज, कर्ता करविता परमेश्वर आहे. त्या जगन्नियंत्यावर भरंसा असला म्हणजे सर्व कांहीं होतें. आपलें थोडेंसें कार्य जरी या दासाकडून झालें आहे, तरी त्यांतच मी आज कृतकृत्य झालों असें समजतों. आतां आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणें आपण निघण्याचें करावें.

( रमाबाई प्रवेश करिते व तशीच बाजूला उभी राहते )

भ०—( तिला पाहून ) मुली ये, अशी कां लाजतेस.

( र०—जवळ उभी राहते )

भ०—( कृतज्ञतेनें ) राजा, काय सांगूं.

( शृंगा ताडोनी या चालीवर )

महदुपकारातें केले आठवूं किती त्यातें ॥ राजा ॥
धन्य तुझी जननी प्रसवुनि ऐशा पुत्रातें ॥ राजा ॥
यवनांची जिरली खोडी ॥ शरणांगत तूतें ॥ राजा ॥
सुत पौत्रही ते प्रपौत्र यांसह संतत संपतितें ॥ राजा ॥
सेवा सुख द्या उभयांतें तुझीं ॥ राजा ॥

मा०—तथास्तु ! तथास्तु ! ! तथास्तु ! ! !

( पडदा पडतो )

( सर्व जातात )

## प्रवेश ३ रा.

( माधवराव व सर्व सरदार मानकरी बसले आहेत असा पडदा उघडतो. )

माध०—मामा, आज दरबार भरविण्याचें कारण ह्या सर्व सरदारांस सांगा.

मामा०—समस्त सरदार हो! मराठ्यांचें खरें शौर्य काय आहे तें दाखविण्याचा प्रसंग सांप्रत आहे. हैदरअल्ली कोणी वलंदेजी लोकांच्या साहायानें कर्नाटकांत नास धूस करित आहे. व आपले अंकित जे पाळेगार यांस त्यापासून फारच त्रास होत आहे. तर ज्यांस यवनसत्ता

बळाऊं देणें इष्ट वाटत नसेल व ज्यास आपल्या धर्माचा, राज्याचा खरा अभिमान असेल त्याणें न डगमगतां बेलाशक शत्रूंवर चाल करण्यास सिद्ध व्हावें. पाळेगार ह्मणजे मराठ्यांचे अंकित, तेव्हां त्यांस मदत करणें व संकटापासून त्यांस मुक्त करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. शिंदे, होळकर, रास्ते, गायकवाड, पटवर्धन, होळकरासारखे शूर येथें असतां गलीमानें येवढी चढाई केलीच हें मोठें आश्चर्य समजलें पाहिजे. असो, कांहीं हरकत नाहीं. शत्रूंनीं कशीही चढाई केली तरी आह्मीं त्याची बढाई कितीशी चालूं देणार आहों, या गोष्टीचा विचार करण्यास आज मुद्दाम दरबार भरविला आहे.

**महादजी**—सरकार, येचा इचार कशापाई; त्यो नोडगा अशी माझ्या डोळ्यांत सलतुया. जन् ती मेंढकिच, आन् ह्यो लांडगा तिला एका खिणांत घशांत टाकील. मला सरकारची आज्ञा मातर व्हावी कीं निघालूच तरवार खेचून. ( तरवार उपसतो )

**तुको**०—सरकार, आपल्या इकड मोठ मोठे पटाईत वाघ असून आपल्याला इचारचं नांवच नको. नोडग कितीही असतना, समद्यांना बोकडावानीं रगडून टाकूं. अस्वल कितीबी गुरगुरल आन कितीबी भ्या दावल तरी दरवेशाचा बडगा पाहिला कीं मांजरावानीं गप्प. शिंदे, रास्ते, पटवर्धन कशापायीं या नखभर कामासनीं. मीच जाऊन त्या मुसंड्याला गचांडच्या देऊनशीं सरकारच्या पायीं घेऊन येतों. त्याची गुरक़ावणी किती या भवानिच्या म्होर ! ( तरवार उपसतो. )

**मा**०—शाबास होळकर, यंवरे मराठी बाणा. खरेंच आहे, असे एकेक पटाईत वाघ मराठ्यांच्या दरबारीं असतां हैदरासारखे कैक लांडगे जरी शेफारले तरी त्यांला एका क्षणांत नाहींसे करितील, यांत काय संषय आहे ?

**रघु**०—मला वाटतें, एवढा उपद्व्याप करण्यापेक्षां ह्या प्रसंगीं हैदरास ख़ंडणी देऊन गप्प केला तर ?

मामा—( त्वेशानें आपल्याशीं ) मदत करण्याची गोष्ट तर राहिली; पण सल्ला मसलत तीही सयुक्तिक नाहीं. दुधांत साखर घालून आणखीं गोडी आणावयाची तीतर एकीकडेसच, उलटें त्यांत हलाहल विष मात्र कालविलें. दादा साहेब यांचा रोंख मी समजलों. कमजास्त बोलतां येत नाहीं. कारण, सरकार पडले. बाकी ही मसलत कुचकामाची ह्मणजे किती, तर यांपासून मराठ्यांचें राज्य खास लयास जाणार. दादा साहेब, आपण ही मसलत देण्यापेक्षां स्वस्थ बसलां असतां तरी बरें होतें. यामुळें आपण व आपला पुत्र लोक—निंदेस व शापास कारण व्हाल. हैदराविषयीं सर्वांच्या हृदयांत अनिवार भडकलेला क्रोधाग्नी आपण पाण्यानें किहो विझविलात! ईश्वरानें अशाच सल्ला मसलती ऐकण्यास आमचे कान ठेविले त्यापेक्षां ते फुटले असते तर बरें झालें असतें ( दीर्घ श्वास सोडतो ) ( शांतपणानें ) मी कमजास्त बोललों याबद्दल श्रीमंतांनीं व आपण मला माफी केली पाहिजे. क्रोधावश झाल्या कारणानें असे प्रमाद घडतात; तरी पुन्हां मीं माफी मागतों.

मा०—कलई करण्यास अशी अनुपम संधी कधीं मिळणार नाहीं. अशा भांडणानें हैदर ह्मणजे एका क्षणांत जिंकून टाकूं, असें मला निःसंषय वाटतें. बरें, रास्ते आतां आपण बोला.

रास्ते०—सरकार माझी विनंती इतकीच आहे ती ही कीं, शिंदे होळकरासारखे महान नामांकीत सरदार सरकार सेवेसीं असतां, त्या हैदरअल्लीच्या मस्तकावर जाऊन नाचण्यास काय अशक्यता आहे? श्रीमंत स्वतः जाऊन त्या हैदराचा पराभव केलेला व खंडणी घेतली तें तो विसरला वाटतें! त्याला ह्या कृत्याची आठवण देण्यास असे शिंदे होळकरादी प्रतापी सिंह कशास पाहिजेत? तो कोल्हा लपंडावी करितो पण शेतकरी बाबाच्या सोडग्याचा जेव्हां चांगला टोला खाईल तेव्हां गप बसेल. त्या शिवाय त्याला आठवण राहणार नाहीं. मला आज्ञा मात्र व्हावी, हा मीं सिद्ध आहेंच.

मा०—शाबास, वीरश्रेष्ठ हो, शाबास; मराठी राज्यास असे हे सजीवकोट असतां कोण मायेचा पुत, त्यांवर वक्र नजर करणार आहे? शिंदे, तुह्मी व होळकरांनीं दोघांनीं मिळून उत्तरहिंदुस्थानांत जावें; आणि मामा व रास्ते यांस घेऊन मी स्वतः हैदरावर जातों. ह्याप्रमाणें व्यवस्था होण्यास जिकडे तिकडे हुकूम द्या. कां सर्वांना पसंत आहे ना हा बेत ! !

सर्व—सरकार, सर्व पसंत आहे; पण आपण येण्याचें करूं नये. आमच्यापैकीं कोणीही जाईल. सरकार—स्वारी येथेंच राहतील असें आमचें ह्मणणें आहे.

माध०—झाला तो बेत झाला, आतां त्याचें काय ! आतां ज्याचें त्याणें आपल्या तयारीस लागावें. जा आतां.

भालदार पुकारतो.

दरबार बरखास्त.

पडदा पडतो.

## प्रवेश ४ था.

( रमाबाई विचार करित बसली आहे आणि दासी जवळ उभी आहे. )

दा०—बाईसाब, अशा काय आपुन आतांशा करितां ? अक्षी तोंड ज़नु चिंतत असल्या वानी.

र०—बाई काय सांगूं ? माझ्या जिवाला किनई चैन नाहीं. ( श्वास सोडते. )

दा०—बाईसाब, अस कां बरें ? सरकार तर आपल्या वांचून पान्याचा घोंट घेत नाहींत. बरें संमदे कांहीं आहे, कमति काय आहे ? अन अपून ह्मणतां चैन नाहीं. अस कस बरें !

र०—( त्रासानें ) अग हें पहा—तुला काय ठाऊक आमच्या काय चिंता आहेत त्या ? तुला सर्व बाहेरचे डामडौल दिसतात. पण

आंत काय आहे हें तुला माहित आहे का ? उगाच आपलें वेड्यां सारखं बोलावं आणि विचारावं ( शांत होऊन ) बरें तर सांगतें आतां;

पद. ( माझ्या मनिचें )

स्वारी जाते सैन्या सहकीं ह्मैसूर प्रांताला ॥
कपटी मेला हैदर सखये त्याशीं लढण्याला ॥
चिंता वाटे नाजुक बाई स्वास्थ न शरिराला ॥
उष्ण बहूही थंडी लागे न मिळे खायाला ॥ १ ॥
बहुपरी कथिलें नच ऐकोनीं दृढ निश्चय केला ॥
येत्यें संगें मीं ह्मणतांची राग किती आला ॥ स्वारी० ॥

दा०—बाईसाब, सरकार तर इकडेच येत्याति. ( दासी जाते )

( माधवराव प्रवेश करितात. )

( रमाबाई उठून मिठी मारत्ये. )

पद.

( अरसीक किती हा शेला ) या चा०

सोडुनि कां मज जातां ॥ प्रिय अबलेला अंतर देतां ॥ ध्रु० ॥
कंठुंकशी दिन रजनीं ॥ चैन मुळीं तें नाहीं स्वमनीं ॥
नाहीं मजला कोणी ॥ या चरणाविण अन्य त्रिभुवनीं ॥
ठाऊक सर्व असोनी ॥ विरहाग्नि मधिं कां बुडवोनीं ॥
अपराधी मीं ह्मणुनीं ॥ निष्ठुर सखया कांहो होतां ॥ सो० ॥

मा०—सखे, असें कां बरें वेड्या सारखें करत्येस ! तुला एकदां सांगितलें कीं आह्मीं लवकरच परत येऊं ह्मणून; मग बरें येवढी काळजी कशाला करित्येस ! मीं एकटाच का जाणार आहें ? माझ्या बरोबर हजारों लोक आहेत. तूं वीर पत्नि असतांनां अशी भित्येस याला काय ह्मणावें ?

र०—प्राणनाथ, आपण ह्मणतां तें सर्व खरें पण मी इथें कोणाच्या आधारावर दिवस कंठावे ?

मा०—हें काय ? अग वेडे, शास्त्रीबुवा, तुझ्या दास दासी, लक्ष्मी-बाई, राधाबाई, या तुझ्या मैत्रिणी आहेत; कसेतरी १ । २ महिने काढ कीं झालें काम ? आह्मीं हेच परत आलों असें समज. राज्य—सुख भोगण्याला आपण धनि, श्रीमंत, राजे, आणि लढाईला दुसरे कां हवेत ? कांहीं काळजी करूं नकोस. सर्व संकटें दूर करण्यास श्रीशंकर कैलासपती समर्थ आहे.

र०—प्रिया काय सांगूं.

पद.

(राधा धर मधु मिलिंद या चा०)

चैन नसे मानसा तुह्मांविण कंठु कशीही निशा ॥
शशिसह असतां जैशी रजनीं ॥ प्रिय नाथासह जैशी कामिनी ॥
वर्षही जातें पळसम निघुनीं ॥ जाऊं नका राजसा ॥ तु० ॥
आप्त सुखाचे नच दुःखाचे ॥ ठावें सर्वहि आपणांसाचें ॥
ऐका भाषण या अबलेचें ॥ जाऊं नका राजसा ॥ तु० ॥

मा०—उगाच दुराग्रह काय कामाचा ? चल मला जाऊं दे.

(उधवा शांतवन करजा)

किति शरिर शुष्क हें झालें ॥ तेजोहिन त्या वदनाला ॥
पाहतां वाटेत भीती टोंचितें सदा हृदयाला ॥
गालही खोल किति गेले ॥ रक्तता नतीं नेत्रांला ॥
या परी स्थिती हो झाली ॥ परि नाहीं इच्छा पुरली ॥
कष्टउनि तनुही आपुली ॥ दुखवितां दीन भार्येला ॥
अन्नाचा लेश न पोटीं ॥ ताकद मग कैशी तनुला ॥ किति०॥

मा०—तें सर्व खरें पण झाला बेत आतां फिरणार नाहीं.

र०—एकच धरून बसले तिथे दुसऱ्याचें काय चालणार ? बरें आपली मर्जी. (श्वास सोडते.)

मा०—(हंसत) आणखीं पहा आपला नारायण सुद्धां या स्वारी

बरोबर आहे. आतां आह्मीं मोठे, कां तो मोठा ? जिवाची काळजी सर्वांस आहेच. उगाच वेड्या सारखें रडतेस यांत काय अर्थ आहे–उगा;

( तिचे डोळे पुसतो. )

र०—बरं, मी सांगतें एवढं तरी ध्यानांत राहील का पण ?

मा०—हो तें बेलाशक सांग. सखे, तूंच माझ्या हृदयांत सदा सर्वदा संचार करणारी मग तुझे बोला बद्दल सांगणें नकोच.

रमा—

पद.

( अर्ध तनु वारुळी या चालीवर )

दिवसा श्रम करणें बहुतां परी, रात्रीं नच जागणें ॥
स्नाना उष्णोदक सेवणें ॥
फराळ करुनीं नियमित वेळीं बेतानें जेवणें ॥
जिवाला फारच संभाळणें ॥
रानोरानीं उगाच सैरावैरा तें भटकणें ॥
शिकारी सर्व थैव टाळणें ॥
चाल ॥ आई कोल्हापुर–वासिनीं कृपा तूं करीं ॥
( आपल्याशीं ) जगदंबे पूजिन शत–दंपत्यें तरी ॥
जरी येतिल माझे प्राणप्रिय लौकरी ॥
( उघड ) ध्यास असावा सिद्धी– विनायक सतत हेंच सांगणें ॥
याविण अन्य काय मागणें ॥

मा०—असें केल्यावर मग तर कांहीं हरकत नाहीं ना ?

( नारायणराव सर्व तयारीनें प्रवेश करितात. )

नारायणराव—दादा निघायचेंनां ? एक घटका रात्र राहिली, सर्व सिद्धता आहे. आपण निघालां कीं सर्व निघालेच.

र०—भावोजी, मुलाचें हो लढाईत काय काम. तुह्मीं व मी आपली सोबती संगतीनें पाऊण एक महिना काढूं तों स्वारी परत येईलच.

( जवळ घेऊन व कुरवाळून ) रहाल न मग माझ्या जवळ ?

ना०—वहिनी, आपण नाहीं बुवा इकडे रहावयाचे. जिकडे दादा तिकडे मीं. बरें तुह्मीं ह्मणतां इकडे राहा आणि आपल्या दादांचे तब्येतीला कोण जपणार ?

र०—( हंसत आणि सलज्ज ) बरें तर जा पण मग तब्येतीला जपून असा बरें. उगाच वणवण करीत इकडे तिकडे फिरूं नका. नाहीं तर आज काय डुकराची शिकार, उद्यां वाघाची शिकार, मग ना खाणें ना पिणें—त्यांत तुमची उष्ण प्रकृति. उगाच ओकारी होण्यास सुरवात झाली मग पहाहो भावोजी आपला विचार; फिकीरींत पडाल.

ना०—आज नाहीं उद्यां आह्मांला स्वारीस गेलेंच पाहिजे. सर्वच कामांत या पुढें दादांना तसदी देण्यांत काय अर्थ आहे ? खरें कीं नाहीं सांगा पाहूं ? पण हें पहा ( हंसून हळूच वहिनीच्या कानांत ) दादांना सांगा कीं तुह्मीं नका येऊं ह्मणून.

र०—( हंसून सलज्य ) मीं सांगून माझें ऐकणें होईल ? कधींच नाहीं. तुह्मींच सांगा पाहूं बरें ?

ना०—अहो वहिनी, मामा साहेब, शास्त्रीबुवा, काका साहेब, मल्हारराव काका, पुष्कळांनीं सांगितलें कीं सरकार—आपण येऊं नये; परंतु ते कोठचें ऐकायाला ? मग मीही निघालोंच दादांच्या बरोबर. ( माधवरावाकडे वळून ) बरें दादा मीं पुढें होतों व सर्व तयारी पाहून आपल्याकडे परत येतों. ( जातो )

मा०—कसा आहे आमचा छोटा सरदार ! तरवार सरसाऊन तयार स्वारीला.

र०—खाण जशी माति—जाति तशी पुति.

( सेनापती पडद्या बाहेर येऊन सर्वांस समजेल अशी सूचना करितो. )

से०— ( प्राप्त होय जें निधान. ) या चा०

चला, निघा, नर सुवीर योद्धे, अरुणोदय झाला ॥

सुवेळ ऐशी प्राप्त पुनः नच कथितों तुह्मांला ॥
यवनांचें निर्बिज करोनी हिंदु राज्याचा ॥
झेंडा यावश्चंद्र दिवाकर भडको आर्यांचा ॥
प्रताप गाजो भुवनत्रयिं या सर्व मराठ्यांचा ॥
सिद्धीपावो महत्कार्य हें लाग समर्थाला ॥ १ ॥

रणवाद्यें वाजतात. सेनापती जातात.

**माधव०**—( दचकून ) हं चला बरें, निघण्याची वेळ झाली. ही पहा सेनापतीची सूचना. ( उठतो )

र०—( उठून ) माधवराव व ती उभयतां प्रेमालिंगन देतात. जय आई भवानी तुळजापुरवासिनी, पर्वती सर्व निर्विघ्न कर. माझी सर्व लाज तुला आहे.

**मा०**—येतों बरं लाडके.

र०—( गहिंवरून व डोळ्यांस पाणी आणून मान हालविते. )

( माधवराव जातात. )

रमाबाई जाते.

पडदा पडतो

**अंक ४ था समाप्त.**

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळ थेऊर राजवाडा.

( माधवराव, रघुनाथराव, सखारामबापु, वैद्य व दुसरे कितीएक मंडळी. )

**मा०**—( खोल स्वरानें ) कोणी आहेत का इथे, ( आयइग करून कुशीस वळतात )

वैद्य—सरकार, होय सर्वजण आह्मीं आपल्या जवळच आहोंत.

मा०—आतां कांहीं माझी धडगत नाहीं हो—हें दुखणें आमचा अंत करणार खास. मनांतल्या सर्व इच्छा मनांतच राहिल्या. असो प्रारब्ध, त्याला काय उपाय ? आजचा दिवस पार पडणेंच कठीण आहे, परमेश्वरा, आतां या देहाची कांहीं आशा राहिली नाहीं. आतां या पासून माझी मुक्तता होऊन तुझें अक्षय व निर्मळ चरण—कमळ मला दाखीव. ( डोळा लागतो )

वैद्य—( आपल्याशीं ) सरकारास जरा थोडीशी डुलकी लागली आहे वाटतें. ( उघड ) हें चांगलेंच,

र०—झोंप लागली वाटतें.

वैद्य—हो चांगलीच लागली आहे.

मा०—( खोकल्यानें जागे होऊन ) हे अनाथ रक्षक प्रभो, मला एकत्यालाच इथं टाकून आपण नाहींतसे झालांत हें काय बरें ? मीं आपल्या समागमें येणार; कोण आहेत हो तिकडे ?

र०—आह्मी सर्वजण जवळ असून असें कां रे बा बावरल्या सारखें करितोस ? काय पाहिजे तुला.

मा०—मला आतां कांहीं नको; माझी स्वतःची मला आतां कांहींच फिकीर वाटत नाहीं. मीं तर आणखीं वटकेनें जाणारच; याबद्दल श्री त्रयमूर्तीनीं मला—अभय दिलेंच आहे. परंतु दादासाहेब, आपल्यास कांहीं सांगणें आहे.

र०—( गहिंवरून ) बाबा, अशी कां रे निरवानिरव करितोस. देवा ? कशाला रे मला असे प्रसंग पहाण्यास जगविलेंस ? माधवराया ! ! अरे असा निराश होऊं नकोस. परमेश्वर कृपेनें तूं लवकरच साफ बरा होशील. आतां मला काय सांगतोस ?

मा०—( नारायणरावास जवळ घेऊन ) दादा, मी तर आतां थोडक्या वेळाचा सोबती; परंतु वडिलांनीं जसा सर्वांचा प्रतिपाळ के-

ला, तसाच आपण माझ्या नारायणाचा करावा–हें लेंकरूं अज्ञान आहे. मागील सर्व गोष्टी विसरून परस्पर प्रेमानें वागा. काकूनांही मी रागाच्या झपाट्यांत, दोन शब्द–बोललों असेन, त्याची मी माफी मागतों ह्मणून सांगा. मोंगलाबरोबर टकरी दिल्या, परंतु त्याचें माझ्या मनाजोगें पारिपत्य झालें नाहीं, तरी तें या बच्चा जवळून करवा. कोणच्याही प्रकारचा मनांत संषय अथवा भिती आणूं नका. सर्व प्रजा तुमच्या आज्ञेंत राहील व जेणें करून तिला सुख होईल असें करा. कर्जाच्या बोजाबद्दल नाईक यांनीं सर्व हवाला घेतला,–ते त्याची सर्व व्यवस्था लावितील. राज्यकारभार तुह्मी स्वतः बेलाशक चालवा, त्याबद्दल कोणी तुमच्या आड येणार नाहीं. ( बापूंस ) तुह्मांलाही जास्त सांगणें नको. हें अज्ञान बालक आहे, याचें नीट जतन करून त्याला योग्य रीतीनें वागवा. मीही आपलें लेंकरूं आहें. मी आपल्यास जास्त काय सांगूं? आपण सर्व जाणतेच आहां. ( कंठ दाटून येतो ) दादा ! ! !

रघु०–बाळा तूं कांहीं काळजी करूं नकोस; जसें वडीलांनीं चालविलें, तसेंच मीं पुढें चालवीन. ( डोळे पाण्यांनीं भरतात. )

सखा०–( श्रीमंतांच्या पायांस हात लावून ) सरकार, मजकडून कोणच्याही तऱ्हेचें वाईट वर्तन होणार नाहीं. आपणास सर्व विदित आहेच, जास्त काय सांगूं ! !

मा०–दादा, नाना, तात्या, बापू, सर्वांनां मी आतां सांगतों, झालेल्या गोष्टीबद्दल कांहींएक मनांत न आणितां, सर्वांनीं एक दिलानें, सुविचारानें, कारभार चालवावा; पेशवाई कायम राखावी, नारायणरावास पेशवा करावें; तो लहान आहे–सर्वांनीं त्यावर नजर ठेऊन त्याच्याच हातून देश कल्याणाचीं कामें करवावीं. ज्यास्त किती सांगूं ! माझ्याच्यानें आतां बोलवत नाहीं. ( नारायणरावास जवळ घेऊन त्याचा हात दादांच्या हातीं देऊन ) दादा, आतां याला सर्वजण तुमच्या लेंकराप्रमाणें

मराठी ग्रंथ संग्रहालय

अगर भावाप्रमाणें कसाही समजा. हा आतां तुमचा आहे. माझें सर्व क्रिया कर्म यथा सांग करा, प्रजेस दुखवूं नका—माझा अखेरचा आशिर्वाद सर्वांस कळवा—( इकडे तिकडे पाहून ती कोठें गेली आहे ? एकदां भेटायाचें होतें—पण नको आतां—तीही आपल्या मागेंच येणार—तुह्मी कां रडतां—कोणी रडूं नका—बापू , या लेंकरास संभाळा—मनाला कांहीं वाईट वाटण्याचें कारण नाहीं—संसार नाटकाचा हा एक छोटासा भागच संपला—अगदीं दुःख करूं नका—नारायणा, असें काय बरें वेड्यासारखें करितोस ? )

**नारायण०**—( रडत दीन स्वरानें ) दादा, कायहो हा माझ्यावर प्रसंग ! तुह्मीं कायहो असें ह्मणतां ! मी आतां कोणाकडे पाहूं आणि जगांत कोणाच्या भरंशावर दिवस काढूं ? देवा, हाय हाय ! ! !

**मा०**—( खोल स्वरानें ) दादा, आतां मात्र नारायणास संभाळाहो ! मला आतां कोणी कांहीं बोलूं नका. माझें चित्त ढळवूं नका. मी आतां कोणाचा नाहीं. तुह्मीं सर्व सुखी असा—तुमची प्रजा, तुमचें राज्य सर्व सुखी असो—नारायणा, घाबरूं नकोस बरें! परमेश्वर—राम—राम—राम.

( माधवराबाचें प्राणोत्क्रमण होतें— )

( एकदम रडारड होऊन पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

( रमाबाई मुर्च्छित पडली आहे. आनंदीबाई वगैरे जवळ बसल्या आहेत. राघोबा, रामशास्त्री, नाना वगैरे मंडळी उभी आहेत. )

**नाना**—परमेश्वरानें हा काय कहर केला आहे ? एक प्रसंग पडला आहेच तों दुसऱ्याची तयारी ! नकोरे देवा असा प्रसंग पाहणें ! !

**र०**—( मुर्छित असतांनाच ) सख्या, आपण चाललांतनां ? मग मला कां इथें एकटील ठेवलेंत, मीही येतें—आपल्याबरोबर ! ( कांहीं वेळानें उठून बसून ) जळो मीं, कसें माझें कपाळ फुटलें; देवा, कशालारे मला

जन्म दिलास; त्यापेक्षां गर्भांतच मीं मेलें असतें तरी बरें झालें असतें.
हे आई तुळशी, कांग बाई अशी निष्ठुर झालीस; नाथा

( उध्धवा शांतवन करजा या चालीवर. )

सौभाग्य सागरा सखया मज कैसा टाकुनी जासी ॥
दीनही खरोखर अबला ॥ दुःखाब्धीं ढकलुनि देशी ॥
पळहि तें कसें मीं लोटूं ॥ तुमच्या विण राहूं कैशी ॥
चा०व० मजवरी कोप कां केला ॥ भंगिलें किं हो आझेला ॥
वचकटू तुझां कां वदला ॥ कायतें सांगणें मजसीं ॥
चा०प० ही अनाथ बुडली बुडली ॥ पंकीं हो धेनू जैसी ॥ सौ० ॥

प्राणनाथा हें काय हो केलेंत ! !

( नच सुंदरी करूं कोपा या चालीवर )

टाकुनि मज एकलिला ॥ सत्वर कां तुम्हीं गेलां ॥
साहूं मीं दुःख कशी ॥ पारन विरहाला ॥ घृ० ॥
जातां कधि स्वारीशीं ॥ येतां दोंचों दिवसीं ॥
देउनियां धीरासी ॥ निर्भय वाटे मजसीं ॥
मजविण निद्रा कैशी ॥ चैन नसे चित्ताशीं ॥
चा०व०भंगुनियां प्रीत अशी ॥ मजवर कां रुसलां ॥
टाकुनि मज एकलिला ॥ स० ॥ १ ॥

सौभाग्य मंदिरा—मी आतां काय करूं ?

तव संगें मीं येतें ॥ कां त्यजितां मज येथें ॥
भोगूं शांती सुखतें ॥ चिरकालिक जें मिळतें ॥
टाकुनियां कोपातें ॥ ऐका मृदु वचनांतें ॥
चा०व० सह चारिण मी असतां ॥ निष्ठुर कां बनलां ॥ टाकुनि मज० ॥

देवा ! ! !

( काय मला भुल पडली )

धांव ! धांव ! ! धांव ! ! ! अतां पार्वती वरा ॥

शरण, शरण, शरण तुला जोडीतें करा ॥ धृ० ॥
हा प्रसंग कां आणिलास मजवरी ॥
घडलें तें घोर पाप काय मत्करीं ॥
हरिलें सौभाग्य कसें सांग सत्वरीं ॥
भक्त–काम–कल्प--द्रुम तूं कसा हरा ॥ धांव०

हे आदि भुमी माते जगज्जननी, तूं तरी मला आपल्या उदरांत जागा दे. हाय हाय प्रभो ! कायरे केलेंस हें ! ! !

प० बाई--बाई साहेब आतां रडून काय होणार ! जें होणार तें चुकत नाहीं. आपण पाहिजे तें केलेंत ह्मणून, झाली गोष्ट येणार आहे काय ! आतां धाकटे रावसाहेब आहेत, हेच आपलें लेंकरूं, असें समजून रहा. त्यानां तरी तुमच्या वांचून ममतेचें कोण आहे ! त्यांनीं तरी आतां कोणाच्या तोंडाकडे पहावें !

र०—बायानो, तुह्मीं ह्मणतां तें सारें खरें. भावोजीनां परमेश्वर सुखी ठेवो. ते पुष्कळ वर्षें राज्य करोत. परंतु माझें मन आतां मला या जगांत राहावयास सांगत नाहीं. जिथें ते पाय तिथेंच आतां मी जाणार; मला आतां कशाचीही आशा राहिली नाहीं. माझे सर्व हेतु पुरले.

प० बा०—धनी साहेब तर सोडून गेलेच, पण बाईसाहेब, आपणाही असें ह्मणतां हें काय बरें ? नकाहो नका—बाई साहेब, आपण तरी असें करूं नका !

र०—

( टाकिला यानें या. चा० )

तोंड हें काळें दावूं कोणाला ॥ साहूं काशी वैधव्याला ॥
निराश्रित झालें पाहूं कोणाला ॥ जन हे निंदितील मजला ॥
कठीण हा माया पाश तोडण्याला ॥ अवगत सर्व सज्जनाला ॥
नाथ–सह गमनीं होईल किर्तीला ॥ भोगूं स्वर्गीं सौख्याला ॥
बरें मज वाटे येउनि जन्माला ॥ लागली तनु सत्कार्याला ॥ १ ॥

बायांनो, तर करा आतां माझी तयारी ? आणा तें माझें पांढरें पातळ, मला नेसवा, माझे आंगावर सर्व-दागिने घाला, मला मळवट भरा, माझी ओंटी भरा, मला जाऊन एकदां भेटूं द्या. चला जलदी करा, आतां उशीर नको लावूं-हें पहा माझ्या करितां-खोटी असायचे.

सर्व जातात.

( पडदा पडतो. )

# प्रवेश ३ रा.

( स्मशान भूमि. )

( चिता रचली आहे. एकंदर सर्व मंडळी जमली आहे. )

**नारायणराव**—हायरे देवा ! ! आतां मीं अनाथ काय करूं ? दादा, वडिलांच्या पाठीमागें दोघे पुष्कळ दिवस राहूं, सखानें राज्य करूं, मोंगलास जिंकूं, सर्व प्रजेस सुख देऊं, हे विचार जागच्या जागीं कसे हो राहिले ! बाहेरचे घोंटाळे सर्व झाल्या नंतर घरची व्यवस्था आपण लावणार होतां, ती कधींहो लागणार आतां ? हैदरावर स्वारी करण्याचे प्रसंगीं केवढें अवसान, किती हुषारी, त्यांचा आतां सर्वस्वी कसाहो लोप झाला ! प्रकृती बिघडणार हें मला हतभाग्याला जर कळतें तर दादा, मी आपल्याला कधींही स्वारीस जाण्यास सांगितलें नसतें. आतां मी एकटा कसा राहूं ? परमेश्वरा तुझ्या घरीं किती रे अन्याय ! अरे, दुसरे तुला ह्यातारे कोतारे, आंधळे पांगळे, कीं जे खरोखर जिवाला कंटाळलेले व जे सदोदित देवा जवळ आम्हांला मरण दे, मरण दे, असें विनवणारे का थोडे होते ? असें असतां कोंवळ्या कोंबावर तूं कशी रे धाड घातलीस ? आशा-वृक्षास नुकतीच कोठें पालवी फुटण्यास लागली होती, तोंच तो वृक्ष मुळा पासून कसा रे तूं नाहींसा केलास ! माझा सर्वस्वी पाठीराखा-माझें अक्षय्य छत्र-माझा अन्नदाता-माझा भाऊ नाहीं, तर पिताच आज कसा रे तूं नेलास !-आतां मी,

दादा अशी हांक कोणास मारूं !–लष्करांतल्या मस्त–हत्तीनें मला ते-व्हांच ठार केलें असतें तर किती बरें चांगलें झालें असतें ! दादा ! ! स्वारीस जाण्याचे वेळीं फराळ वेळच्या वेळीं करा–शिकार करूं नका, जिवास त्रास देऊं नका, असें वैहिनीनें नानातऱ्हेनें सांगितलें आणि आतां अन्न पाण्याविना तडफडत परमेश्वरा, कसारे माझ्या दादांना घे-ऊन चाललास ! हे अधमा कृतांता, निलाजऱ्या तुलाही कांहीं दया नाहीं कायरे ? हाय हाय परमेश्वरा ! !

( रमाबाई सहगमनाच्या तयारीनें प्रवेश करिते )

नारा०—( तिला पाहून दुःखानें ) वहीनी, तुझीही दादांबरो-बर जाण्याचा निश्चय केलात आणि मी एकट्यानें इथं कोणाच्या आ-शेवर हा दिवस कंठावे ?

र०—भावोजी ! ! !

( भाव धरारे या चा० )

शोक त्यजावा ॥ श्रीशंकर हृदयीं ध्यावा ॥
तनु कां कष्टवितांहो अपुली ॥ होउं नच ती गोष्ट जहाली ॥
विपरित काळ गतीही आली ॥ धीर धरावा ॥ श्री० ॥ १ ॥
भोगा संतति संपत्तीतें ॥ करुनी सुखवा राज्य प्रजेतें ॥
रिपुवर जाती सर्व लयातें ॥ भाव धरावा ॥ श्री० ॥ २ ॥

ना०—वहिनी गेलें हो गेलें, सर्व वैभव आज मला–न अशा स्थितींत राहण्या पेक्षां–सन्याशी होऊन, एखाद्य ऊन देहत्याग–करावा, यासारखा–दुसरा उत्तम मार्ग नाह

र०—

चाल वरची—

वदतां कांहो ऐसी वाणी ॥ राखावा हा सुवंश–कोण
आनंदानें काळ क्रमोनीं ॥ बोध ठसावा ॥ श्रीशंकर ॥

( नारायणराव तिला साष्टांग नमस्कार घालितो.

र०---( त्यास उठवून जवळ घेऊन ) मामंजी, भावोजींनां--संभाळा बरें! हें लेंकरूं आहे असें समजून वागवा.--हें आतां आपलेंच आहे.--मी सर्वांस नमस्कार करित्यें. रामशास्त्री वगैरे मंडळी--बाई, तूं आमच्या पायां--पडण्यास योग्य नाहींस. आह्मींच तुझ्या पायां पडतों.-- ( तसें करितात )

**पद.**

( मला शांतमुनि भासतो-- )

सतीधन्य तूं धन्य कलिमाजीं धन्या ॥
कोण तुजसम जगीं देवि अन्या ॥ धृ० ॥
लेंकरा सम प्रजा पाळिली सर्वही ॥
चाललां--उभयतां स्वर्ग लोकां ॥
टाकुनीं माउली जातसे बालकां ॥
दुर्दशा ठावकी सकल लोकां ॥ १ ॥
पुष्पवृष्टी करुत देव तुह्मांवरी ॥
अक्षयी--शांति सुख अमुप भोगा ॥
माफ सर्वहिं करा,--सापराधी आह्मीं,
लोभ ठेवा, त्यजा सर्व रागा ॥ स० ॥

( गहिंवरतात. )

ळनें तर दे

सतें. आतां मं य सगिते देवी, मातोश्री--आह्मीं सर्वमण--तुला साष्टांग

न्याय ! अरे, दु ों. ( तसें करितात )

खर जिवाला कं चेतेजवळ जाऊन प्रदक्षणा करून )

दे, मरण दे, उ

**पद.**

कोंबावर तृ

( अर्धतनु वारुळीं )

पालवी फुटण भगवन्नारायणा वंदितें, कोल्हापुरवासिनी ॥
केलास ! माझ भवानी भक्त सौख्य दायिनी ॥ धृ० ॥
दाता--माझा अग्नि, वायू, इंद्र, चंद्र, रवि, विनवी कर जोडुनी ॥

करावी; कृपा तुझीं अनुदिनीं ॥
हे यमधर्मा, नृपोत्तमा तुज आनंदें प्रार्थुनी ॥
नसावी; अवकृपा तव मनीं ॥

चाल ॥ घडलीं या जन्मीं पापें जीं मत्‌करीं ॥
उद्धारायाला उभय कुळां सत्वरीं ॥
जात्यें-मीं पति-सह स्वर्गीं आज्रीं तरी ॥

पद. अखंड सुख सेवाया; जनहो लोभ असोंद्यामनीं
सुखवो ईष तुह्मां निशिदिनीं ॥ भग० ॥

( चितेंत प्रवेश करित्ये. )

वाद्यांचा एकच गजर होतो.

सर्व लोक—हाय हाय ! विश्व जननी, ममतेची खाणी; सती श्रेष्ट रमाबाई आज गेली हो गेली—भारत दिनमणि, यवनाचा शास्ता, दिनांचा कैवारी, सज्जनांचा पुरस्कर्ता, आज अस्ताला गेला. नशीब आमचें !!

पडदा पडतो.

**अंक पांचवा समाप्त.**

---

( पु. क. परमेश्वरास प्रार्थना. )

पद.

देइं, देइं, देइं, हेंच श्री परेश देवा ॥ धृ० ॥
मातृ पितृ प्रेम मनीं, सतत असो हें स्मरुनीं ॥
सार्थक जन्मास वरुनि, घडो चरण सेवा ॥ १ ॥
गुरु वडिलीं पूर्ण भाव, न घडो कधिं अंतराव ॥
प्राप्त होय कितीही विभव, तिळही नको हेवा ॥ २ ॥

सन्मार्गीं सुमन वळो, कुमती ती सर्व जळो ॥
भव बाधा दुरित पळो, लोभ नष्ट व्हावा ॥ ३ ॥
अन्नवस्त्र पोट भरी, देइं सख्या जन्मवरी ॥
जन्म मरण येरझारी, तुह्मीं प्रभो चुकवा ॥ ४ ॥
मार्तंड हीच आस, पुरवि प्रभो सावकाश ॥
तव चरणीं घडो वास, हाच देइ ठेवा ॥ ५ ॥

## समास.

